


# महाभारत

मराठी अनुवाद

श्री. अशोक कोठारे

खंड ४५

शांतीपर्व

# महाभारत

## महाभारत खंड पंचेचाळीसावा

## शांती पर्व भाग दहावा

## मोक्ष धर्म पर्व

अशोक कोठारे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.
http://www.esahity.com/230923432381235123662340238123 50.html

# महाभारत

मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचना व्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन : १० ऑक्टोबर २०२१**

## अनुवादकाचे दोन शब्द –

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याच वेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, एक शैक्षणिक माध्यम म्हणून वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना तो गद्यात केला आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये. त्या शिवाय, सामान्य वाचकांना कथाभाग अधिक चांगल्या प्रकारे समजावा म्हणून कांहीं टीपा दिल्या आहेत.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम प्राचीन (Archaic) शब्दप्रयोग वापरतात परंतु, माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मूळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत पंचेचाळीसांपेक्षां

जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्यातील हा पंचेचाळीसावा खंड, शांती पर्व भाग दहावा, मोक्ष धर्म पर्व, आपण आता वाचणार अहात. ह्या खंडामध्ये शुद्ध अध्यात्म विद्या सांगितली आहे. ह्या आधीच्या शांती पर्वांतील खंडांतून नितीशास्त्र समजावून सांगितले आहे. हिंदू धर्माचे हे दोन भाग आहेत. त्यानंतर कर्मकांड येते परंतु, त्यावर महाभारतात विशेष चर्चा केलेली नाही. कर्मकांड आगम शास्त्रातून तयार झाली आहेत.

शांती पर्वात हिंदू धर्माचे मूलभूत ज्ञान सांगितले आहे. त्यात नितीशास्त्र, अध्यात्म विद्या आणि कर्मकांड अशा तीन विभागात ते दिलेले आहे. युधिष्ठीर व भिष्म ह्यांच्या संवादाच्या रुपात ते दिलेले आहे. नितीशास्त्रात माणसांने इतर लोकांशी, प्राण्यांशी व वस्तुमात्रांशी कसे व्यवहार करावेत त्याचे विवरण आहे. अध्यात्मविद्येत माणसांने त्याच्यामध्ये असलेल्या आत्म्याला कसे समजून घ्यावयाचे त्याची चर्चा केलेली आहे. कर्मकांड माणसाला त्याचे भाग्य बदलण्याची इच्छा असते त्यासाठी विविध देवतांना कसे खूष करावयाचे त्यासाठी काय करावे त्याची माहिती आहे. कर्मकांड हा एकाप्रकारे भ्रष्टाचाराचा भाग आहे. देवतांना वशिले लावून आपले भाग्य सुधारता येते अशा संकल्पनेतून हा भाग विकसित झाला आहे. कर्मकांड कितपत माणसाचे दैव सुधारू शकते हा विवाद्य विषय आहे. मनुष्य आशावादी असतो व म्हणून तो कृत युगापासून त्या वशिलेबाजीत रमलेला आहे. कृतयुगात प्रामुख्याने यज्ञ त्यासाठी सांगितले आहेत. परंतु, कलीयुगात त्याचे स्वरुप बदलून सामान्य पुजा विधीमध्ये ते रुपांतरीत झालेले आपण पहातो. उपास तापास, व्रतवैकल्ये, शाकाहार करणे अशी आणखीन कांहीं रुपं कर्मकांडात आपण पहातो. शुद्ध हिंदू धर्मात कर्मकांडाला महत्व नसते. त्यात पहिले दोन म्हणजे नितीशास्त्र आणि अध्यात्मविद्या ह्यांच्यावर भर असतो. कर्मकांडाचे महत्व पुरोहित वर्गांने त्यांच्या स्वार्थासाठी अवास्तव प्रमाणात वाढवले आहे आणि कर्मकांडातील विधी करणे म्हणजेच हिंदू धर्म असा एक गैरसमज पसरवण्यात ते यशस्वी झालेले आहेत हे आपल्याला दिसते. त्यासाठी अनेक संघटना पुरोहीत वर्गाने यशस्वीपणे कार्यरत केल्या आहेत. समर्थ रामदासांनी तीनशे वर्षापूर्वीच त्यांच्या दासबोधात ते सगळे दिले आहे परंतु, त्याकडे हिंदू

समाजाचे त्याच्या अशिक्षित रहाण्याच्या प्रवृत्तीमुळे दुर्लक्ष झालेले आहे. प्रत्येक हिंदूंने त्याला त्याचा धर्म समजून घ्यावयाचा असेल तर शांतीपर्व चांगले लक्ष देऊन वाचावे.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्या आधीची असती तर त्याचा उल्लेख त्या काळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्या नंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, सम्राट अशोकाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत

त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे. कदाचित असें म्हणता येईल कीं, महाभारत हा एक दंतकथांचा संग्रह आहे व त्याद्वारा नैतिकमुल्ये शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे व्यासांना ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो मात्र अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राजांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. कर्मकांडासाठी आगम शास्त्रांचा अभ्यास करावा लागतो ते महाभारतात नाही. अध्यात्मविद्येत माणसाने स्वतामधील परमेश्वर कसा पहावा, कसा त्याच्याशी संपर्क करावा त्याचे शिक्षण असते तो विषय शांतीपर्वात विशेषकरून सविस्तरपणे पाहिलेला आहे. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ असला तरी भक्तीमार्गी निश्चितच नाही, तो ज्ञानमार्गी आहे. असे माझे मत आहे. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता, व्याध गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई–साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः धन्यवाद.

अशोक कोठारे



माझा ई-मेल –
ashokkothare@gmail.com

ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई–पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई–साहित्य करणार आहेत परंतु, हे ई–पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.
http://www.esahity.com/2309234323812351236623402381235O.html

# - शांती पर्व भाग दहावा सुरू -

# मोक्ष धर्म पर्व

## भाग एकशे एकाहत्तरावा

शौनक पुढे बोलतात, अरे सौती, तुझे प्रवचन फारच चांगले झाले आहे. येथे जमलेले सगळे जोगी त्यावर फार संतुष्ट झाले आहेत. त्यांचे (नारदाचे) जे संभाषण झाले ते ऐकण्यात मोठे पुण्य मिळाले आहे तसे पुण्य तीर्थयात्रा करुन व देवाच्या नांवाने पुजा करूनही कोणाला मिळणार नाही. आम्ही ते ऐकून पुण्यवान झालो आहोत. त्या देवाचे दर्शन ब्रह्मालासुद्धा मिळत नसते असे नारदाला झाले. ते धन्य झाले. नारदाला ते दर्शन मिळाले कारण नारायणांची त्याच्यावर खास कृपा होती. परंतु, आम्हाला समजत नाही कीं, ते नारायणाचे दर्शन अनिरुद्धच्या रुपात झाले तरी त्यानंतर नारदांना पुन्हा बद्रीला येऊन तेथे नर नारायणाचे आणि हरीचे दर्शन पुन्हा घेण्याची कां इच्छा झाली? अरे सौती, तुला त्याबद्दल कांहीं सांगता येईल कां"?

सौती बोलतो, तेथे सर्पयज्ञ होत असतांना जनमेजय जो परिक्षिताचा मुलगा आहे, यज्ञाच्या मधल्या काळात ब्राह्मण थोडे विश्रांति घेत असतांना त्याच्या आजोबांच्या आजोबांना म्हणजे व्यासांना विचारतो, स्वर्गीय ऋषी नारद शुभ्र बेटाकडून आल्यावर त्याला शुभ्र बेटावर नारायण काय बोलले त्यावरील त्यांची काय प्रतिक्रिया होती"?

नारद बद्रीला आल्यावर तेथे ते पहातात कीं, नर आणि नारायण कठोर तपस्या करत आहेत. तेथे नारद त्या ऋषींशी काय बोलतात? नारायणाशी झालेला त्यांचा संवाद म्हणजे ज्ञानसागरच होता. प्राचीन पुराणांप्रमाणे नारायण अंतिम देवता आहे. तो सगळ्या जीवांत असतो आत्म्याच्या रुपाने. नारायण सगळ्या चराचराचे उगमस्थान आहे. नारायणाने जे ज्ञान नारदाला दिले त्याची तुलना सगळ्या तीर्थयात्रा आणि याज्ञांशी केली तर ते संभाषण त्याहून श्रेष्ठ असल्याचे समजते. ते आख्यान मनापासून ऐकण्याने पापाचा नाश होईल. माझे पूर्वज जे लढाई जिंकले त्यापेक्षा त्यांच्या बरोबर कुरुक्षेत्री नारायण होते ते जास्त महत्वाचे होते. ज्यांच्या बरोबर नारायण आहेत ते जिंकणार ह्यात

कांहीं नवल नव्हते. मोठे भाग्यवान होते माझे ते पुर्वज ज्यांना नारायणाची साथ होती. ज्यांच्या अध्यात्मिक आणि ऐहीक भल्यासाठी स्वतः नारायण आहेत त्यांचे कल्याण होणार ह्यात शंका नको. नारायणाचे खरे रुप पहाण्यासाठी कठोर तप करण्याची गरज असते. त्या दृष्टीने पहाता प्रमेश्थीचा मुलगा नारद मोठा भाग्यवान होता. त्याला नारायणाचे दर्शन अनिरुद्ध ह्या त्यांच्या विशुद्ध रुपात घडले होते. नारायणाच्या कृपेमुळे ते घडले हे सत्य आहे. त्यानंतर पुन्हा नारद बद्रीला त्यांचे वास्तविक रुपात दर्शन घेण्यासाठी आले होते ते समजले. त्यात त्यांचा कोणता उद्देश असावा त्याबद्दल सांगा. तेथे त्यांचे काय संभाषण झाले? ते दोन ऋषी नारदाशी काय बोलले"?

वैशंपायन बोलतात, "व्यासांना शतशः वंदन करून त्यांनी जे सांगितले त्यांच्या संभाषणाबद्दल ते सांगत आहे. शुभ्र बेटात आल्यावर ते नारायणाला अनिरुद्धाच्या रुपात पहातात. त्यानंतर ते लवकरच मेरूकडे पाचारण करतात. त्यांच्या कानात ते देवाचे बोल घुमत होते. ते दर्शन घेऊन त्याने काय संपादन केले ह्याचा तो ऋषी विचार करत असतो. तो ते मोठे अंतर पार करून सुरक्षितपणे आला त्याचे त्याला नवल वाटत होते. पुढे तो नारद मेरूवरून गंधमादन पर्वताकडे निघतो, आकाश मार्गे ते त्या ठिकाणी पोहोचतात जेथे बद्री आहे. ते तेथे स्वताचीच पुजा करत आहेत ते नारद पहातात. त्यांच्या उरावर पवित्र श्रीवत्स चिन्ह नारद पहातात. दोघाच्या जटा झाल्या होत्या. तपस्येने त्यांचे शरीर कृष झालेले दिसत होते. त्यांचे तेज सूर्यासारखे वाटत होते. दोघाच्या पंजावर हंसपाद चिन्ह होती. ते अजानुबाहू होते. त्यांना चार मुख चार हात होते. त्यांच्या तोंडात साठ दांत होते. त्यांचा आवाज घोगरा होता. जणूकाय ढग गडगडत आहे. त्यांचे चेहरे रुंद होते. कपाळं मोठी होती, त्यांची नाक लांबसडक (तुरतुरीत, घोड्यासारखे) होती. डोकी गोल होती. त्यांच्याकडे पाहिल्यावर ते कोणी उच्चकुलिन आहेत हे समजत होते. त्याना पाहून नारद नम्रपणे त्यांना अभिवादन करतात. ते ऋषी सुद्धा नारदांचे स्वागत करतात. त्यानंतर नेहमीच्या क्षेमकुशल चोकशा होतात. नारद त्यांना पाहून त्यांच्या मनात विचार करू लागतात, त्या शुभ्र बेटावर ज्याना पाहिले त्यांत आणि ह्यात फार साम्य त्याना वाटत होते. अशा विचारात ते त्या ऋषींना प्रदक्षिणा करतात. असे विचार मनात असतांना ते नारद त्यांना दिलेल्या

गवताच्या आसनवर जाऊन बसतात. ते दोन ऋषी त्यांचे सकाळची पुजाविधी उरकतात. त्यानंतर ते नारदाची यथासांग (स्वागत) पुजा करतात. नारदाचे पाय ते रिवाजानुसार धुतात. त्यांना अर्घ्य देतात. अशारीतीने ते दोघे नारदाचे अतिथी म्हणून स्वागत करतात. अशारितीने ते नारदाचे इतक्या लांबून आल्याने जे श्रम झाले होते ते काढतात, नारद शांत होतात. त्याचे जे आदरतिथ्य झाले होते त्यामुळें ते अतिसंतुष्ट झालेले होते. त्यानंतर ते नर नारायण नारदांना बोलतात, "आपण शुभ्र बेटात परमात्म्याचे दर्शन घेऊन आला आहात. ज्याच्या मधून आपण सगळे उद्भवलो आहोत". ते ऐकल्यावर नारद बोलतात, "मी ते अवर्णनीय अस्तित्व माझ्या ह्या चर्मनेत्रांनी पाहिले आहे. त्यात सगळे विश्व कसे सामावलेले आहे ते समजले. आता मला तुमच्यात ते पुन्हा दिसत आहेत. त्या अस्तित्वाच्या जवळ मी तुम्हा दोघाना पाहिले आहे. परमात्म्यानी मला सुटी दिल्यावर मी निघालो आणि येथे तुम्हाला पहावयाला आलो आहे. परमात्म्यानी मला क्षेत्रज्ञाचे कार्य काय ते सांगितले आहे. त्यांनी त्यांचे भविष्यातील सगळ्या अवतारांबद्दल सुद्धा सांगितले आहे. शूभ्र बेटावरील लोकांना वासना अजिबात नाहीत हे माझ्या लक्षात आले. त्यांचे आत्मे पूर्ण जागृत आहेत असे मला दिसले. ते सतत त्या विभूतीचीच आराधना करत असल्याचे मी पाहिले. त्यांच्यात ती विभूति गुंतली आहे हेसुद्धा मी पाहिले. जे त्याच्यात गुंततात त्यांमध्ये तो गुंततो हे मी समजलो. तो एक कारण आहे, त्याच वेळी परिणाम आहे, तो सर्वशक्तीमान आणि अमाप सामर्थ्य असलेला आहे. ज्याचे कोणी वर्णन करू शकणार नाही. तपस्येने त्याचा आत्मा विशुद्ध झाला आहे. त्यामुळें तो शांतता आणि समाधान देत असतो. त्याला सूर्य तापवत नाही किंवा चंद्र शितल करत नाही. जे त्याला यज्ञात ब्रह्मा आणि पशुपतिकडून दिले जाते त्यात तूप, मांस आणि इतर जे असते ते त्याला मिळते असे जे वेदांत सांगितले आहे ते मी अनुभवले आहे. तो त्याच्या एका पायावर उभा आणि त्याचे दोनही हात आकाशाकडे आणि मुख पूर्वेकडे अशा योग मुद्रेत ध्यान करत होता. त्याला त्यानंतर सगळ्या देवता, राक्षस, दैत्य, दानव आहुत्या देत होत्या त्याची कृपा प्राप्त करण्यासाठी. तो सगळ्यांची भक्ती मोठ्या मनाने स्वीकारत असतो. त्यांनी मला जाण्याची मुभा दिली म्हणून मी तुमच्याकडे आलो आहे. ह्यापुढे

मी अनिरुद्धाच्या रुपातील नारायणाबरोबर म्हणजे तुमच्या बरोबर रहाण्याचे ठरवले आहे. नारद बोलत होते. मोक्ष धर्म पर्व भाग एकशे एकाहत्तरावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

# भाग एकशे बाहत्तरावा

नर नारायण नारदाला बोलतात, "अहो ऋषी, तुम्ही सर्वोच्च कौतुकाचे मानकरी झाला अहात. तुम्ही श्रेष्ठ ठरला अहात जेव्हापासून तुम्ही अनिरुद्धच्या रुपात नारायणाला प्रत्यक्ष पाहिले आहे. माझ्या बेंबीतील कमळातून आलेले ब्रह्मदेव सुद्धा ते रुप पाहू शकत नाहीत. पावित्र्य असलेला पुरूष जो अव्यक्त असतो तो सुद्धा कोणाला दिसत नाही. तो (भक्ती) भावाचा भुकेला असतो. कारण ती त्याच्या कडे नसते. बाकी सगळे त्याचेच आहे. म्हणून जो त्याला भक्ती देतो तो त्याला प्रिय होतो. तेथे आमच्या शिवाय इतर कोणीही जाऊ शकत नाही. तेवढे तपोसामर्थ्य सहसा सापडत नाही. त्याच्यातून विविध गुण उत्पन्न होतात ते नंतर इतरांना (पंचमहाभूतांना) दिले जातात. त्यातून आलेला क्षमाशिलतेचा गुण त्याने पृथ्वीला दिला आहे. त्यातून रुची हा गुण उत्पन्न झाला. तो त्यांने पाण्याला दिला आहे. त्याच्यातून जड उर्जा उत्पन्न झाली जी उष्णाता आणि प्रकाशांच्या रुपात असते ती त्याने सूर्याला दिली. स्पर्श गुण त्याने वायूला दिला आहे. म्हणून वार्याने आपल्याला स्पर्श केला असे जाणवते. त्याने आवाज तयार केला. तो त्याने आकाशाचा गुण म्हणून सांगितले, त्यामुळें ते आकाश जे साधारणपणे अव्यक्त भासते ते व्यक्त होते. त्या अस्तित्वातून मन तयार झाले ते त्याने चंद्राला दिले. म्हणून मनावर चंद्राचे स्वामित्व असते. शहाणपणाला सत् म्हंटले जाते. त्यावर वेदाचा अधिकार असतो. मोक्षाचा मार्ग दाखवण्यासाठी आदित्य तयार झाले. आदित्य अज्ञानरुपी अंधार काढून टाकण्यासाठी तयार केला आहे. आदित्याची पुजा करणार्यांचे शरीर तो भस्म करतो म्हणून त्यानंतर त्याला कोणी पाहू शकत नाही. असे लोक त्यानंतर आदित्य लोकात जातात. त्यातील कांहीं शरीर संपल्यामुळे केवळ मनं रहातात. ते प्रद्युमनाकडे जातात. त्यातील जे सांख्य विचार समजतात ते शंकरासनमय होतात. तो आत्मा म्हणून पुढे जन्मजन्म प्रवास करत रहातो. तो आत्मा अध्यात्मिक उर्जेच्या कमीजास्त होण्याप्रमाणे सत्त्व, रज आणि तमोगुण व्यक्त करतो. तो क्षेत्रज्ञ म्हणून ओळखला जातो. अरे नारदा, तुला माहित आहे किं, माझे वासुदेव हे रुप

विश्वातील गृहस्थांसाठी आश्रय असतो. ज्यांच्यात आत्मसंयम आहे, ज्यांना मर्यादा समजतात, ज्यांचे जीवन म्हणून पवित्र आहे ते माझ्या वासुदेव रुपात एकरुप होतात. सांप्रत आम्ही धर्माच्या कुळांत जन्म घेतला आहे त्याचे कारण बरीच कामं राहून गेलेली आहेत जी उरकण्याची आवश्यकता आहे. ती आम्ही दोघे पूर्ण करणार आहोत. त्यासाठी आम्ही तपस्या करून आमची अध्यात्मिक उर्जा वाढवून आमची तयारी करत आहोत. अरे नारदा, तू त्या शुभ्र बेटात गेला होतास तेव्हां तू एक निर्धार केला आहेस जो आम्ही जाणतो, ह्या तिनही जगात जे कांहीं घडते ते सगळे आम्ही समजत असतो कांहींही आमच्या पासून लपू शकत नाही".

वैशंपायन पुढे सांगतात, ते नर नारायणांचे ऐकून नारद पूर्णपणे त्यांचे भक्त होतात. त्यानंतर नारद नारायणाने सांगितलेले अनेक मंत्र गाऊ लागतात. नारायणाची आराधना करत नारद त्या दोघांबरोबर त्यांच्या बद्रीच्या आश्रमात राहू लागतात. असे ते तिघे देवांची एक हजार वर्षे बद्रीमध्ये रहातात.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे बाहत्तरावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग एकशे त्र्याहत्तरावा

वैशंपायन बोलतात, एकदा तेथे बद्रीत रहात असतांना प्रमेश्थीचा मुलगा नारद, देवतांची पुजा करण्यासाठी तयारी करत असतो. त्याची जय्यद तयारी होत आहे ते पाहून नर जो त्या जोडीतील मोठा आहे नारदाला विचारतो, "हि कोणाची पुजा तू करत आहेस? कोणत्या पित्रांची पुजा तू घालत आहेस? संहितेच्या कोणत्या नियमानुसार तू हे करत आहेस? ते कां करत आहेस? त्यापासून तुला काय लाभ होणार आहे? कोणत्या देवतेची पुजा त्याने तू करणार आहेस"?

नारद नराला सांगतात, "तुम्ही म्हणता अशी पुजा (यज्ञ) करणे परमेश्वराची पुजा करण्या इतकेच महत्वाचे आहे. त्या प्रमाणे, मी नेहमी विष्णूची पुजा अशारितीने करत असतो. त्यामुळे त्या अतिश्रेष्ठ देवतेच्या कृपेने ब्रह्मदेव म्हणजे प्रमेस्थी उच्च पदाला गेले आहेत. त्यांनी माझे पिता दक्ष ह्यांना ती पुजा करण्यास सांगितले होते. जो ब्रह्माचा मुलगा होता सगळे उत्पन्न होण्या आधी ते उत्पन्न झाले होते. त्यानंतर मी दक्षाचा मुलगा म्हणून जन्म घेतला होता. म्हणून अहो पवित्र मुनी मी ती पुजा (श्राद्ध) करण्याची तयारी करत आहे. ज्यामुळें नारायणाकडे ते जाऊ शकतील. त्याचे नियम त्यानींच घालून दिलेले आहेत. ख्यातनाम नारायण सगळ्यांचे पिता, आई, पितामह असें सगळे असतात. म्हणून पितरांसाठी जे कांहीं आपण करतो ते अखेरीस नारायणाकडेच जात असते. असे ऐकीवात आहे कीं, एके काळी देवता त्यांच्या मुलांना श्रृती शिकवतात आणि दानवांशी लढण्यासाठी जातात. ते युद्ध अनेक वर्षे चालले. शेवटी युद्ध संपल्यावर ते त्यांच्या मुलांच्याकडे आले कारण त्यांना श्रृतींचा विसर पडला होता. तेव्हां ते त्यांच्या मुलांकडून श्रृती पुन्हा शिकतात. त्यावेळी ते मोठे होते व त्यांची मुलं लहान होती. जसे ते आजोबा व मुलगा नातू असावा. तरी त्या नातवाने त्यांना वेद शिकवले म्हणून ते (लहान मुलगा) त्यांचे गुरूस्थानी झाले. त्यामुळे आजोबा व मुलगा, नातू एकमेकांची पुजा करू लागले होते. तशी प्रथा सुरू झाली होती. ते सगळे आपण जाणता अहात. ते प्रथम गवताची गादी करतात व त्यावर देवता व त्यांची मुलं

तीन पिंड ठेवतात. अशारितीने ते एकमेकांचे श्राद्ध करू लागतात. हे मला ठाऊक आहे पण मला ठाऊक नाही, त्या पितृना पिंड असे कां म्हणतात आणि तीनच पिंड कां"? ते सांगा अहो नरा.

नर नारायण सांगतात, फार प्राचीन काळी पृथ्वी तिच्या कक्षातून सरकली होती. त्यावेळी गोविंद रुपात नारायण एका भल्यामोठ्या वराहाचे रुप घेऊन त्याच्या सुळ्यांवर ती पृथ्वी उचलून तिच्या कक्षाच्या जागेवर आणून ठेवली होती. ते करतांना त्या आदिपुरूषाच्या अंगाला पृथ्वीचे चिखल चिकटले होते. तो त्या चिखलाने बरबटला होता. त्यानंतर सूर्य उगवला आणि त्याची प्रार्थना करण्याची वेळ आली, वराह रुपातील नारायण त्याच्या अंगाला एक मोठा झटका मारतो त्यामुळे त्याच्या अंगाला चिकटलेल्या चिखलाचे तीन गोळे खाली पृथ्वीवर फेकले जातात. अहो नारद पुढे असे झाले कीं, त्याआधी जमिनीवर पसरलेल्या गवताच्या गादीवर ते गोळे पडतात. भगवान विष्णू ते गोळेच पिंड म्हणून घेतात आणि त्यासाठी त्यांनी लावलेल्या तीळाच्या रोपांचे तेल त्या गोळ्यांना लावून ते पिंड म्हणून स्वतःच स्वीकार करून घेतात. पूर्वेकडे त्यांचे मुख होते. त्यानंतर तोंच नियम होतो पिंड देण्याचा. ते वृशकपीच्या रुपात बोलतात, "मी ह्या सृष्टीचा कर्ता आहे, मी जाहीर करतो कीं, अशाप्रकारेच पितरांना पिंड द्यावयाचे आसेल. असे सांगून तो परमेश्वर त्या विधीचे इतर नियम सांगू लागतो. त्याप्रमाणे पिंडदानाची प्रथा सुरू झाली. ते तीन गोळे होते म्हणून नेहमी श्राद्धासाठी तीन पिंड देण्याचा पद्धत रुढ झाली. ते तीन गोळे आपल्या पूर्वजांचे रुप समजून त्यांची पुजा करण्याचे निश्चित झाले. मी पिता, मींच आजोबा, मींच पणजोबा असें समजून व मींच त्यात आहे अशी कल्पना करुन तो विधी करण्याचे नियम मी दिले. असे बोलून वृक्षकपी पहिले पिंडदान करतो. अरे सूज्ञ ब्राह्मणा, वराह पर्वताच्या पठारावर ते घडले. त्या श्राद्धाने वृक्षकपी त्याचेच श्राद्ध करतो. त्यानंतर तो तेथून अंतर्धान पावतो. त्याकाळापासून ती पद्धत झाली आहे. त्यानंतर सगळे पितर त्यांच्या वंशजानी दिलेले पिंड आनंदाने स्वीकारू लागले कारण ती पद्धत सांगितली आहे नारायणांनी. श्राद्धात विष्णूचा उल्लेख होणे अगत्याचे असते. सगळे विष्णूची पुजा मनाने (भावनाने), कर्माने

आणि विचाराने (बुद्धीने) करण्याचा रिवाज निश्चित झाला. परमेश्वराची भूमिका सर्व काळी सगळ्यांबद्दल सारखीच असते. त्याला कोणी जवळचा अथवा दूरचा असे नसते.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे त्र्याहत्तरावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे चौर्याहत्तरावा

वैशंपायन पुढे सांगतात, नारायणाचे ते ऐकून नारदांची त्याच्या प्रति असलेली भक्ती वृद्धींगत झाली. ते त्यांच्या बरोबर एक हजार दैवी वर्षे राहिले होते. त्याकाळात त्यांने त्यांचे जवळून निरीक्षण केले होते. त्यानंतर तो स्वर्गीय ऋषी नारद त्यांच्या ठिकाणी हिमालयात जातो. मात्र ते दोघे त्यांच्या बद्री आश्रमातच असतात. तेथे त्यांचे घोर तप चालू होते. आता तू पांडवांच्या घरात जन्म घेतला आहेस परंतु, हे जे तू ऐकत होतास त्यामुळे तुझ्या पापाचा क्षय झाला आहे. जे हरीचा द्वेष करतात ते नष्ट होतात.

जनमेजय बोलतो, "परंतु, ते कसे शक्य आहे, कारण हरीचा द्वेष करणे म्हणजे स्वताचा द्वेष करण्यासारखे आहे. ते कोणाला समज नाही असें कसे शक्य असेल"?

आपले गुरू गंधवतीचा मुलगा, व्यास ह्यांनी स्वतः ते लिहीले आहे. मी त्यांच्या तोंडून ते ऐकले आहे. ते जसे ऐकले तसे आपण मला ऐकवले आहे अहो वैशंपायन". ह्या पंथाची संहिता तिच्या सगळ्या रहस्यांसह नारदाने तयार केले आहे. तुम्ही हरीगीतेत त्यांची संहिता मला सांगितली आहे. जी युद्धाच्या प्रसंगी नारायण कृष्णाच्या रुपात अर्जुनाला सांगतो. आपले व्यास जे कृष्ण द्वैपायन आहेत ते नारायण आहेत पृथ्वीवर. त्यांच्याशिवाय दुसरा कोण महाभारत रचू शकेल"? विविध कर्तव्यांचे व कार्याचे विश्लेषण दुसरा कोण इतक्या तपशिलात करू शकतो"? मी एक यज्ञ करू इच्छितो आहे, तो योग्य प्रकारे होऊ द्यावा. आता तुझा यज्ञ चालू कर असें वैशंपायन जनमेजयाला सांगतात.

सौती पुढे सांगतो, त्या श्रेष्ठ राजांनी ते ऐकल्यावर ते सगळे विधी करण्यास सुरूवात केली. तुमच्या प्रश्नाचे उत्तर मी तुमच्या सह ह्या नैमिष्यारण्यातील सगळ्या जमलेल्या ऋषींना ऐकवले आहे. त्यात नारायणाचा विषय मी सांगितला आहे. आधीच्या काळात नारद ते ऐकवत होते. ते पंडूपुत्र आणि भिष्म ऐकत होते. नारायण सदाचाराचा नमुना आहे. तो श्रृती सांगणारा आहे. त्यांचे नियम पाळण्याने शांती, आनंद, समृद्धी प्राप्त होते. जे देवांना श्रेयस्कर आहे ते हरीला मान्य असते. म्हणून तो देवतांचा देव आहे.

तो असुरी संपदा जगणार्यांचा नाश करणारा आहे. तो दैवीसंपदा जगणार्यांचा त्राता आहे. त्याने मधू आणि कैतभ असे दैत्य मारले आहेत. त्याच्या कृपेने अभय प्राप्त होते. यज्ञात दिलेले तो स्वीकारतो. तो सगुणी आणि निर्गुणी असा दोनही आहे. म्हणून तो परमेश्वर आहे. तोंच प्राचीन पुरूष आहे ज्याबद्दल सांख्य सांगतात. तो सुक्ष्म आहे व स्थुलसुद्धा आहे. त्याचे वर्णन शब्दाने होत नाही. त्याच्या गुणांची गणती नाही व तसे पाहता त्याला गुणच नाहीत असा विलक्षण आहे हरी. तो योग्यांची बुद्धी आहे.
मोक्ष धर्म पर्व भाग एकशे चौर्याहत्तारावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे पंच्याहत्तरावा

जनमेजय विचारतो, "मी आपल्या मुखातून परमेश्वराच्या ख्याती बद्दल ऐकले आहे. मी तेसुद्धा ऐकले आहे कीं, नारायण धर्माच्या घरात जन्म घेतात. आपल्या कडून पिंडांची माहितीसुद्धा मला मिळाली. कोणत्या देवता प्रवृत्तीच्या (ऐहिक सुखात रमणारे) लोकांनी पुजावयाच्या व कोणत्या निवृत्तीच्या (मोक्षाचा ध्यास असलेले) लोकांनी पुजावयाच्या तेसुद्धा समजले. आपण आम्हाला विविध विषयांची माहीती दिली आहे, त्यात नारायणाच्या अश्वमुखा रुपाचे सुद्धा सांगितले. जे वायव्य दिशेकडे असलेल्या शुभ्र समुद्रात असलेल्या शुभ्र बेटात दिसत असते. ते अश्वमुख रुप परमेश्थीच्या अवतारातील ब्रह्मांना दिसत होते. परंतु, त्याबद्दलचे इतर तपशिल जसे, सामर्थ्य किती, कोणाशी तुलना होऊ शकेल ते सांगितलेले नाही. ब्रह्माने त्याचे अश्वमुख रुप दर्शन झाल्यावर काय केले"? अहो ब्राह्मणा, मला ह्या प्राचीन गोष्टींबद्दल मोठे कुतूहल वाटते. तरी त्यांची माहीती देऊन तुम्ही आमच्यावर मोठी कृपा केली आहे".
सौती बोलतो, "मी तुम्हाला त्याचा इतिहास सांगणार आहे. जो मान्यवर ऋषी वैशंपायन परिक्षिताला सांगतात तोंच मी तुम्हाला तसांच सांगणार आहे. जो त्या सर्पयज्ञाच्या समयी सांगितला होता. त्यावेळी परिक्षिताने सुद्धा असेंच प्रश्न विचारले होते".

जनमेजय बोलतात, "मला सांगा, असे काय कारण होते कीं, हरी देवादिदेव, त्या अश्वमुख रुपात दिसत होते"?

वैशंपायन बोलतात, ह्या सृष्टीतील सगळे त्या पंचमहाभूतांतून उद्भवले आहे आणि त्यातील सजीवांत तो परमेश्वर आत्म्याच्या रुपाने अध्यात्मिक उर्जा त्या जीवांना पुरवत असतो. म्हणून तो सगळ्या चराचरांचा मुख्य उर्जा स्त्रोत असतो.

त्याची दोन रुप झाली जेव्हां सृष्टीत अध्यात्मिक उर्जेचे कमी जास्त असें विभाजन झाले व त्यातून सत्त्व, रज आणि तम गुणांचे प्राबल्य वाढले त्यातील सत्त्व गुण निवृत्तीचा प्रेरक होता आणि रजोगुण व तमोगुण प्रवृत्तीचा प्रेरक होता. परंतु, नारायण त्या दोघातही असतो मग त्यातील फरक समजण्यासाठी अनिरुद्ध रुप ज्याचे मुख अश्वाचे होते तो रजोगुण आणि तमोगुणाचा दर्शक ठरला. म्हणून रजोगुणात आणि तमोगुणात व्यस्त असलेले नारायण अश्वमुखी रुपात अनिरुद्ध म्हणून ऋषींना दिसू लागले. अश्वमुखी अनिरुद्ध प्रवृत्तीचा देव झाला आणि सगळे त्या प्रवृत्तीत असलेले नारायणाची अनिरुद्ध म्हणून पुजा करू लागले. त्या रुपातील नारायणाचे ध्यान महान ऋषी पांचाळ जे गवाल वंशाचे होते करत होते व मोठी साधना करून त्यांनी कर्मयोगाच्या शास्त्राचा चांगला अभ्यास केला होता. त्यामध्ये त्यांना रूद्राने मदत केली होती असें पुराणात दिले आहे.

मी तुला ते सगळे थोडक्यात सांगितले आहे. त्यात तुझ्या प्रश्नाची उत्तर आहेत. नारायण आवश्यकते प्रमाणे त्यांच्या मायावी सिद्धींच्या मदतीने त्याला हवे ते रूप घेत असतात. हरी सांख्य आहेत व त्याच वेळी योग सुद्धा आहेत. नारायणांचे अंतिम स्थान निवृत्तीत असते. तेथे पोहोचलेला तथागत म्हणून सांगितला जातो. तरी त्यात अहंकार सुक्ष्मसा रेंगाळत असतो लिंगदेहाच्या रूपात. मोक्षात व निवृत्तीत हा मोठा फरक आहे कीं, मोक्षीच्या आत्म्याला लिंगदेह चिकटलेला नसतो. मोक्षी परत कधीही मृत्यूलोकात येत नाही. तसे निवृती पावलेल्याचे नसते. निवृत्ती झालेला तथागत नारायणाच्या आज्ञेने मृत्यूलोकात कांहीं कल्याणकार्या साठी अवतार घेऊन जात असतो. म्हणजे निवृत्ती पावलेला अजूनही प्रकृतीचा भाग असतो. त्यात सात्त्विक कां होईनां अहंकार असतो. ज्याला अस्मिता म्हणतात. कारण तो अहंकार निष्पाप असतो. अनेक ऋषी मुनी निवृत्त अवस्थेतील असूनही मृत्यूलोकात कांहीं सत्कार्य करत असतात. त्यांना

अनेक सिद्धी देवता मदत करत असतात. मोक्षी तसा कधीच मृत्यू लोकात येत नाही. मोक्षीला ह्या सृष्टीसाठी कांहीं कार्य उरलेले नसते. मोक्षीला सिद्धीदेवतांची मदत मिळत नाही. ते चमत्कारसुद्धा करत नाहीत जसे प्रवृत्तीत असलेले योगी करतात. चमत्कार करण्यासाठी सिद्धीदेवतांची मदत आवश्यक असते. अरे जनमेजया, व्यास महर्षी त्यांचा मुलगा शुक मोक्षप्राप्त करतो म्हणून त्याना जी खंत वाटते त्याचे कारण हेंच होते. शुक त्यानंतर कधीच मृत्यूलोकात जनकल्याणा करतासुद्धा येणार नव्हता. व्यास मोक्ष प्राप्त करू शकत असूनही मुद्दाम प्रवृत्तीत रहाणे योग्य समजत होते कारण त्यांना पुन्हा पुन्हा लोककल्याणार्थ पृथ्वीवर यावयाचे होते. मोक्ष धर्म पर्व भाग एकशे पंच्याहत्तरावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग एकशे श्याहत्तरावा

जनमेजय पुढे विचारतात, "हरी त्याची भक्ती करणार्यावर नेहमी प्रसन्न असतो आणि जे संहितेत दिले आहे त्याप्रमाणे यज्ञ करणार्यांच्या कामना पूर्ण करतो असें समजते. ज्यांचे पाप संपले आहे, ज्यांचा वेदाचा अभ्यास परंपरेने झाला आहे, ते चौथ्या अवस्थेत जातात. म्हणजे, पुरूषोत्तमाच्या वासुदेवाच्या जवळ जातात. परंतु, ज्यांची भक्ती नारायणाकडे निस्सीम आहे त्यांना वासुदेव प्राप्त होतो ती पांचवी अवस्था असते. म्हणून भक्ती मार्ग ज्ञानमार्गापेक्षा श्रेष्ठ असतो. त्या भक्तांना पहिल्या तीन पायर्या, अनिरुद्ध, प्रद्युम्न आणि शंकराशन त्यांना घ्याव्या लागत नाहीत. जे ब्राह्मण वेदांचा, उपनिषदांचा, अंगांचा रितसर अभ्यास करतात ते आणि यती जे जोगी आहेत ते नारायणाच्या भक्तांपेक्षा कमी दर्जाचे असतात. मला सांगा हा भक्तीमार्ग प्रथम कोणी प्रचारात आणला. कोणी देवता होती कीं, कोणी ऋषी"? "आत्म्याने भक्ती करणे म्हणजे काय करावे? कशी भक्ती करणे? केव्हां पासून अशी साधना प्रचारात आली, कोणी प्रथम ते सांगितले"? मला सगळे सविस्तरपणे सांगा. त्या विषयाबद्दलची माझी उत्कंठा फार वाढली आहे.

वैशंपायन सांगतात, ते तेव्हां घडले जेव्हां पांडवांच्या फौजा आणि कुरूच्या फौजा रणांगणात उतरले होते व अर्जुन फार कष्ठी झाला होता, तेव्हां भगवान स्वतः बोलले कीं, कोण युद्ध करतो व कोण खरोखच युद्ध करतो ते समजणे सोपे नाही. भगवंतानी युद्धाच्या सुरूवातीलाच ते अर्जुनाला सांगितले जेव्हां ते हरीगीता (भगवद्गीता) सांगत होते. त्या संहितेत भगवंत एक धर्म सांगतात अर्जुनाला जो त्यांचा पहिला भक्त होता जरी त्याला त्याची जाणीव नव्हती. ज्यांची मति भ्रष्ट आहे त्यांना तो धर्म समजणार नाही. तो धर्म फार पूर्वी कृतयुगात प्रथम सांगितला गेला होता. त्या काळी हाच मुद्दा पार्थाने नारदापुढे मांडला होता त्याच्या त्या जन्मात. ते इतर ऋषींच्या पुढे झाले होते. त्यावेळी कृष्ण आणि भिष्म उपस्थित होते (त्यांच्या त्यांच्या गत जन्मात) असें सांगतात. माझे गुरू कृष्ण द्वैपायन ऐकत होते, नारद सांगत होते कीं, त्याना भक्तीमार्ग दैवी ऋषींनी

सांगितला होता. ते जसे नारदाने सांगितले तसेंच माझ्या गुरूंनी आम्हाला सांगितले आहे. ते तसेंच मी आता तुला सांगणार आहे. ते नीट ऐक, त्या कल्पात ब्रह्माचा जन्म झाला नारायणाच्या विचारसागरात आणि तो नारायणाच्या मुखातून बाहेर आला. नारायणांनी स्वतः त्यांचे दैव आणि पौत्र विधी उरकले, जसे रिवाज होते. जे ऋषी त्या विचारसागराच्या फेसावर जगतात त्यानी तो धर्म आत्मसात केला. त्या ऋषीना वैकुंठ म्हणतात. त्यांच्याकडून सोमाला ते मिळाले. त्यानंतर तो विश्वातून हरवला गेला. ब्रह्माच्या दुसर्या जन्मात जेव्हां तो नारायणाच्या नेत्रांतून येतो. त्याला हा धर्म सोमाकडून मिळतो. त्यानंतर तो धर्म तो (ब्रह्म) रूद्राला सांगतो. त्या प्राचीन युगात जेव्हां रूद्र योगात व्यस्त होता, तो हा धर्म त्याच्या सारख्या योगात रमणार्या वालखिल्य ऋषींना शिकवतो. नारायणाच्या मायेमुळें पुन्हा तो गहाळ होतो. ब्रह्माच्या तिसर्या जन्मात जो नारायणाच्या जिभेतून होतो पुन्हा हा धर्म नारायणाच्या इच्छेने प्रचारात येतो. तेव्हां तो सुपर्ण ऋषीला समजतो. ऋषी सुपर्ण त्याचा प्रचार गाऊन करत असतो. त्याच्या त्या गायनामुळे त्या धर्माला त्रिसुपर्ण असें नांव पडले. त्याचा उल्लेख ऋग्वेदात आहे. त्याचे नियम महाकठीण आहेत. सुपर्णाकडून वायूदेव तो शिकतो. वायूदेव चैतन्याचा स्रोत असतो. वायूदेव हा धर्म त्या ऋषींना शिकवतो जे यज्ञाचे उरलेले खाऊन त्यांचा उदरनिर्वाह करत होते. त्या ऋषींकडून तो सागराला मिळतो. त्यानंतर तो धर्म पुन्हा नारायणात लुप्त होतो. ब्रह्माचा नंतरचा जन्म नारायणाच्या कानातून झाला तेव्हां कल्पात काय झाले ते ऐका. त्याला (ब्रह्माला) नारायण बोलतात, "अरे मुला, तुझ्या मुखातून सगळे चराचर तू आता उत्पन्न कर. त्यासाठी लागणारी अध्यात्मिक उर्जा मी तुला पुरवीन. त्याप्रमाणे तो ब्रह्म त्याच्या मुखातून त्या कल्पातील सृष्टी उत्पन्न करतो. त्या कल्पात त्या धर्माला सत्तवत असें नांव मिळाले. त्याप्रमाणे कृतयुगाचे नैतिकतेचे नियम ठरले. ब्रह्मदेव लवून नमस्कार करतो नारायणाला आणि त्याच्या कडून तो धर्म त्यातील सगळ्या रहस्य आणि खुब्यां सह शिकतो ज्या अरण्यक वेदांत आहेत. नारायण नंतर ब्रह्माला बोलतात कीं, अरे ब्रह्मा, तू आता ह्या कल्पाचा सर्वासर्व आहेस. ह्या युगाचे नैतिकतेचे आणि अध्यात्मिकतेचे सगळे नियम तू चोख अमलात आणशिल. ते तुझे कर्तव्य असेल. असे सांगून नारायण अंतर्धान पावले. ते त्यानंतर अशा ठिकाणी

जातात जेथे फक्त सात्त्विकता असते. त्या अव्यक्त दुनियेत माणसे निष्काम कर्म करत असतात. त्यानंतर बलशाली ब्रह्म विविध चराचर उत्पन्न करतो व नव्या सृष्टीची सुरूवात करतो. ते युग पुण्यवंतांचे होते सगळे शुभ मंगल होते. त्या युगाला कृत अथवा सत्य युग म्हणून ओळखले गेले. तेथे सत्तवत धर्म अमलात होता. सगळे जग त्या धर्माचे पालन करत असे. चांगुलपणा, माणूसकी, भूतदया, प्रामाणिकपणा आणि मर्यादा (हिंदू धर्माची ही पांच मूलभूत नैतिक तत्त्व आहेत) ह्या नैतिकतेच्या नियमांचे पालन चोख होत होते. सगळे सुखी होते. ब्रह्मा स्वतः नारायणाची पुजा करत असे. त्यानंतर ब्रह्मा मनुला, त्याच्या मुलाला सांगतो की, त्याने एक स्मृति तयार करावी ज्यात ब्रह्मणांना नैतिकतेचे मार्गदर्शन होईल. त्या मनुचे नांव होते स्वरोचिन. तो स्वरोचिन त्याच्या मुलाला ज्याचे नांव होते शंखपाल ते शिकवतो. तो त्याचा मुलगा सुवर्णनभ ह्याला ते शिकवतो. जो दहादिशांचा अधिकारी होता. त्या सुमारास कृतयुग संपले. त्यानंतर भीषण काळ आले व बरेच कांहीं जे चांगले होते कृतयुगात ते नष्ट झाले. मग त्रेतायुग सुरू झाले. तेव्हां पुन्हा तो धर्म लोप पावतो. पुन्हा नवा ब्रह्म अवतरतो, नारायणाच्या नाकातून तो येतो. तेव्हां नारायण पुन्हा तो धर्म ब्रह्मदेवाला शिकवतो. त्यानंतर ब्रह्माचा मुलगा सनतकुमार तो धर्म चांगला अभ्यासतो. त्याच्याकडून तो विराणाला मिळतो. त्याच्याकडून तो रैव्याला मिळतो. रैव्य त्याचा मुलगा कुक्शी ह्याला तो शिकवतो. तो चारही दिशांचा मानकरी होता. त्यानंतर पुन्हा एकदा तो लुप्त होतो. जगाला त्याचा विसर पडतो. त्यानंतर ब्रह्माच्या नंतरच्या अवतारात जो नारायणाच्या तोंडातून झाला होता, तोसुद्धा कालवश होतो. ब्रह्माच्या नंतरच्या अवतारात जो अवतार एका अंड्यातून झाला होता जे अंडे नारायणांने टाकले होते. तेव्हां पुन्हा नारायण धर्म सांगतात. ते ब्रह्म सगळ्यांना सांगतो त्यात ऋषी वृहषद होते. त्यांच्याकडून तो ब्राह्मणांना समजतो. ते ब्राह्मण सामवेद जाणत होते. त्या ब्राह्मणांना ज्येष्ठ समजले जात होते. त्या ज्येष्ठाना सामवेद चांगला माहित होता म्हणून त्याना कांहीं ज्येष्ठसामव्रत हरी, असें म्हणत होते. त्याच्याकडून ते राजा अविकंपनाला समजले. त्यानंतर पुन्हां तो धर्म विसरला गेला. ब्रह्माच्या सातव्या अवताराच्या वेळी जो नारायणाच्या बेंबीतून आलेल्या कमळातून झाला आहे, त्याला पुन्हा एकदा नारायण तो प्राचीन धर्म सांगतात. ते ह्या

कल्पाच्या प्रारंभी झाले. तो ब्रह्मदेव त्याच्या इच्छासुताला म्हणजे दक्षाला तो धर्म सांगतात. दक्ष तो धर्म त्याच्या मुलींच्या ज्येष्ठ मुलांना शिकवतो. म्हणजे आदित्य तो धर्म शिकतो कारण तो सावित्रीपेक्षा मोठा होता. आदित्यकडून विवस्वात तो शिकतो. त्रेता युगाच्या प्रारंभी विवस्वात ते ज्ञान मनुला देतो. त्याला त्या धर्माचे संरक्षण करण्याचे काम देतो ज्यामुळें तो पुन्हा पुन्हा विसरला जाणार नाही. तो इक्ष्वाकूला तो धर्म शिकवतो. त्याच्या प्रयत्नाने तो धर्म सगळीकडे ज्ञात होतो. जेव्हां जगाचा विनाश होणार तेव्हां तो धर्म पुन्हा नारायणाकडे राहील. जो धर्म यति आचरणात ठेवतात तो हरीगीतेत नारायणानी तुला (अर्जुनाला) युद्धाच्या प्रसंगी थोडक्यात सांगितला आहे. नारदाला तो नारायणाकडून समजला होता. त्या धर्माचा उद्देश माणसात सत्त्वगुण वाढावा असा आहे. मनाला शिस्त नसलेले रजोगुणी आणि तमोगुणी तो धर्म आचरण्यात आणण्यात कमी पडतात. त्या धर्मानुसार कोणाला इजा होत नाही. त्याच्या प्रमाणित आचरण्याने नारायण प्रसन्न होतात. कांहीं समजतात कीं, नारायणाला फक्त एकच अवतार आहे, जो अनिरुद्ध आहे. कांहीं त्याला प्रद्युम्न म्हणून जास्त चांगले समजतात. कांहीं त्याची तिनही रुप पुजतात अनिरुद्ध, प्रद्युम्न आणि शंकरशन. कांहीं त्याचे चौथे रुप वासुदेव सुद्धा पुजतात. मी तुला तो निरंतन निष्काम भक्तीचा धर्म सांगितला आहे. मला हा धर्म माझ्या गुरूंकडून मिळाला. असे फार कमी आहेत जे नारायणाची भक्ती त्यांच्या आत्म्याच्या (साधारणपणे मनुष्य कोणतेही कार्य जीवाच्या मदतीने शरीराच्या संवर्धनार्थ करतात परंतु, जेव्हां नैतिक साधना आत्म्याच्या साक्षीने जीव करतो तेव्हां ती दैवी साधना ठरते. असें योग शास्त्रात सांगितले आहे.) मदतीने करत असतात. जे चांगुलपणा, माणूसकी, भूतदया, प्रामाणिकपणा आणि ते मर्यादेने आचरण्यात आणतात ते नारायणाला प्रिय असतात. जर सगळे लोक ह्या धर्माचे प्रामाणिकपणे पालन करतील तर नेहमी कृतयुग जगाच्या (पृथ्वीच्या) त्या भागात असेल जरी इतरत्र कलीयुग असले तरी. निरिच्छ मनाने आपली कामं करावीत आणि त्याचे जे फळ मिळो अथवा न मिळो नारायणाला अर्पण करावे असा साधा विचार आहे त्या धर्मात. जो तसे मनापासून करतो तो नारायणाचा खरा भक्त समजला जातो. तो धर्म व्यासांनी, माझ्या गुरूंनी युधिष्ठीराला सांगितला होता अनेक ऋषी, कृष्ण स्वतः

आणि भिष्म ह्यांच्या समक्ष. जरी तो नारायणाच्या नांवाचा जप करत नसला तरी तो हरीचा परम भक्त ठरतो व हरी त्याच्यावर प्रेम करतो. माझ्या गुरूला नारदाने तो सांगितला होता त्या धर्माच्या प्रामाणिक आचरण्यामुळे नारद भक्त परमहंस झाले आहेत. हा धर्म आचरणारे त्या शूभ्र बेटाचे रहिवाशी बनून रहातात.

जनमेजय विचारतात, "मी पहात आहे कीं, असे ब्राह्मण ज्यांचे आत्मज्ञान बर्यापैकी आहे, विविध कर्तव्ये निरिच्छपणे करत असतात. तसे इतर ब्राह्मण कां करत नाहीत उलट इतर व्रते आणि अनुष्ठानादि कर्मकांडात त्यांचा समय वाया कां घालवतात".

वैशंपायन सांगतात, तुला माहीत आहे माणसाची अध्यात्मिक अवस्था सगळ्यांची सारखी नसते. ज्यांची उच्च असते ते सात्त्विक असतात व ते हा योग समजून आचरू शकतात. त्यांच्या भक्तीला निष्काम कर्म भक्ती म्हणतात. त्याउलट ज्यांची अवस्था खालची म्हणजे रजो अथवा तमो आहे त्यांना हा योग समजत नाही. ते अहंकाराने प्रेरित अशा मोहात, त्यातून उत्पन्न होणार्या लोभात अडकून मला (नारायणाला) समजत नाहीत. तशा अज्ञानी अवस्थेत ते त्याचे कार्य निष्काम मनाने करू शकत नाही. तसे करता येऊ शकते, तेंच त्यांना पटत नाही. ते त्यांच्या अज्ञानात रमलेले असतात व त्यांच्या अज्ञानाचे ते समर्थन करत असतात. असे रजोगुणा किंवा तमोगुणी ब्राह्मण इतर व्रते आणि अनुष्ठानं करण्यात त्यांचा समय वाया घालवतात. हरी फक्त सात्त्विक प्रवृत्तीचा चाहता असतो. ते निवृत्तीचे लक्षण आहे. परंतु, इतर देवता नारायणाने तयार केल्या आहेत ज्या रजो आणि तमोगुणांच्या लोकांचे भले करण्यासाठी असतात. म्हणून त्या प्रकारचे लोक ज्यात ब्राह्मणसुद्धा असतात तशा देवतांच्या कृपेसाठी तशी व्रते आणि अनुष्ठान करत असतात. रजोगुण आणि तमोगुण प्रवृत्तीचे लक्षण आहेत.

जनमेजय पुढे विचारतो, मला प्रवृत्तीबद्दल आणखीन ऐकावयाचे आहे कारण मी पहातो कीं, त्यात रमलेले सुद्धा नारायणाची भक्ती (तोंडपुजा) करत असतात.

वैशंपायन त्याला सांगतात, सांख्यांच्या गणनेप्रमाणे पंचविसावा असलेला गुण जेव्हां पूर्णपणे निष्काम कर्म करू लागतो त्याच्यातील सुक्ष्म पुरूषोत्तम जागृत होतो. कारण त्या अवस्थेत तो सात्त्विक झालेला असतो. असें सांख्यांच्या अरण्यक वेदात दिले आहे. तेंच नारदाने सांगितलेल्या पंचरत्र संहितेत दिले आहे. रजो आणि तमोगुणी सुद्धा

यथाक्रम सत्त्व गुणाकडे जाणार असतात, हे नारायण ओळखून असतात. म्हणून त्यांच्याकडे सुद्धा ते कृपादृष्टीने पहात असतात. मी तुला तो नारायणाचा धर्म समजावून सांगितला आहे. तो तूसुद्धा आचरण्यात ठेव त्यांने तुझे कल्याण होईल जसे नारदाचे झाले. जे त्यात पूर्णतया रमतात त्यांना एकांत असें म्हणतात. तोंच त्या शुभ्र बेटावरील यती आचरत असतात. हा धर्म आचरणे वाटते तितके सोपे नाही. मनाचा निर्धार, सूज्ञता, नारायणावरील श्रद्धा असें जर असेल तर मात्र तो धर्म आचरणे अवघड नसते.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे श्याहत्तरावा संपला.

## मोक्ष धर्म पर्व क्षक्षक्ष
## भाग एकशे सत्त्याहत्तरावा

जनमेजय बोलतात, "पंचरत्र संहिता, सांख्य प्रणाली आणि अरंण्यक वेद हे सगळे एकच विचार सांगत असतात का निरनिराळे विचार सांगत आहेत"? माझ्या प्रश्नाचे उत्तर आपण द्यावे त्यानंतर पंचरत्र संहितेची आणखीन माहिती मला सांगा. प्रवृत्तीच्या विशेषतेची माहिती द्या".

वैशंपायन सांगतात, "त्या माझ्या गुरूला माझे शतशः प्रणाम ज्याला गंधवतीने जन्म दिला पराशराकरता. कांहीं सांगतात किं, ते ब्रह्माचे कारण आहेत ह्या युगाकरता. ते नारायणाचा सहावा अवतार आहेत. ते सगळ्या ऋषींमध्ये अव्वल आहेत. ते योगशास्त्राचे मोठे जाणकार आहेत. त्यांचा जन्म एका विलक्षण करणासाठी झाला होता त्या कृष्ण बेटावर. जेथे त्यांचे बालपण गेले. ते वेदाचा सार आहेत. कृतयुगात नारायणाचा मुलगा म्हणून ते जन्मले होते. ते चालता बोलता वेद आहेत.

जनमेजय त्यानंतर विचारतात, "आपण सांगत होता कीं, ऋषी वसिष्ठाना एक मुलगा झाला होता ज्याच नांव शक्त्री होते. त्या शक्त्रीला पराशर नावांचा मुलगा झाला होता. त्या पराशराचा मुलगा आहे व्यास मुनी. असे आपण आधी मला सांगितले होते ते मी आठवतो त्यात आता तुम्ही सांगता कीं, व्यास नारायणाचा मुलगा आहे, ह्याचा अर्थ काय मी समजावा"? मला सांगा तो नारायणाच्या पोटी झालेला जन्म आणि पराशराच्या पोटी झालेला हे एकच व्यासाचे दोन जन्म होते कां"?

वैशंपायन बोलतात, "वेदाच्या अभ्यासात गुंतलेले आणि धर्मशास्त्राचा ध्यास असलेले माझे गुरू हिमालयात कांहीं काळ रहात होते. महाभारताची रचना करतांना त्यांना फार कष्ट झाले होते व त्यामुळे त्यांना थकवा आला होता. त्या काळात त्यांचे पांच शिष्य सुमंत, जेमिनी, पैल, मी आणि शुक त्यांची देखभाल करत असू. तेथे ते महादेवासारखे तेजस्वी दिसत होते. वेदाची पुनरर्चना केल्यानंतर ते महाभारताची रचना करत होते. असे होत असतांना एकदा ते त्यांच्या विचारात मग्न असतांना आम्ही त्यांना त्यांच्या नारायणाच्या पोटी जन्माबद्दल विचारले. श्रृतीचा अर्थ आणि महाभारत

झाल्यानंतर ते त्यांच्या त्या नारायणाच्या पोटी झालेल्या जन्माचे सांगतात. व्यास सांगतात कीं, "अरे माझ्या शिष्यानो, नीट ऐका मी काय सांगतो ते, हा एका ऋषीच्या जन्माचा इतिहास आहे. ते कृतयुगात झाले. त्याची माहिती मला ध्यान करत असतांना माझ्या दिव्य दृष्टीने मिळाली जशी योग्याना होते. ब्रह्मदेवाच्या सातव्या अवताराच्या वेळेची गोष्ट आहे. त्यावेळी नारायण मोठे घोर तप करत होते. ते चांगले आणि वाईट ह्याच्या पलिकडे गेले होते जेथे नैती (कांहीं नाही) फक्त भासते. त्या अवस्थेत त्यांनी प्रथम ब्रह्माला त्यांच्या नाभितून निर्माण केले. त्याला नारायण बोलतात, "तू माझ्या नाभितून तयार झाला आहेस. आता तू नवीन जीव सृष्टी तयार कर. ते समजण्यासारखे किंवा अद्भूत कसेही असतील. ती आज्ञा ऐकल्यावर ब्राह्माचा गोंधळ झाला व तो कांहींच करू शकेना. तो मान वाकवून नारायणाला सांगतो, "अहो हरी, मला असें विलक्षण जीव कसे उत्पन्न करता येतील"? माझ्याकडे त्यासाठीची प्रतिभा नाही. त्यासाठी कांहीं करा". ते ऐकल्यावर नारायण अंतर्धान पावले. त्यानंतर ब्रह्म विचार करू लागले. बुद्धीची देवता त्यांच्यापुढे प्रकट झाली. योगशक्तीच्या मदतीने नारायण ती देवता ब्रह्माला उपलब्ध करतो. ते तिला बोलतात, "तू ब्रह्मामध्ये जा आणि त्याला चराचर उत्पन्न करण्याची प्रतिभा दे. त्यानंतर नारायण ब्रह्माला विचारतात काय तू आता ते जीव उत्पन्न करू शकशिल"? ब्रह्मदेव सांगतात कीं, "हो मी आता ते करू शकेन". त्यानंतर नारायण त्यांच्या अद्वैत रुपात गेले जे अव्यक्त सुद्धा असते. त्यानंतर ब्रह्म ज्याला परमेश्थी म्हणतात सगळी चराचर उत्पन्न करतात त्यात दैत्य, दानव, गंधर्व, राक्षस असे पापकारक तयार झाले होते त्यांच्या पापभारामुळें पृथ्वी अस्वस्थ झाली होती. त्यातील कित्येक दैत्य, दानव आणि राक्षस घोर तपस्या करू लागतात. त्यांना त्यांच्या तपस्येमुळे जे पुण्य मिळाले होते ते देऊन ते ब्रह्माकडून व महादेवाकडून मोठे वर प्राप्त करतात. त्या व्यवहारात त्यांची शक्ती वाढत गेली होती. त्या वरांच्या जोरावर ते देवतांना आणि निरहंकारी ऋषींना त्रास देऊ लागतात. देवता अहंकार विरहित होत्या व हे असुर अहंकार सिद्ध होते. त्यांच्यात झगडे सुरू झाले. त्यामुळें जो भार वाढत होता तो कमी करण्यासाठी नारायणाला जन्म घेणे क्रमप्राप्त झाले होते. वाईटांचा नाश आणि चांगल्यांचे संरक्षण करण्याचे काम त्याला करावे लागत होते. पृथ्वी क्षमाशिल

असल्यामुळे तिला मदत करण्याचे कार्य नारायणांवर आले. नारायण एका नागाचे रुप धारण करतात. त्यांच्या फण्यावर ते पृथ्वीचा भार उचलून धरतात आकाशाच्या पोकळीमध्ये. त्यानंतर अहंकारीचे उपद्व्याप नियंत्रित करण्यासाठी नारायणांना विविध अवतार घ्यावे लागत होते. कधी वराह, कधी नृसिंह, कधी बटूक, तर कधी मनुष्य (राम) असे कित्येक अवतार तो घेत होता, वेळोवेळी. नारायण बोलतात, "भो"?, त्या भो मधून ऋषी सारस्वत येतात. अशारितीने नारायाणाच्या तोंडातून तो मुलगा जन्म घेतो. त्याचे दुसरे नांव आहे अपंतर-तमस. तो ऋषी भूत, वर्तमान आणि भविष्य सगळे जाणत असतो. तो तत्त्वनिष्ठ आणि मोठा सत्यवादी असतो. तो आल्यावर प्रथम नारायणाला वंदन करतो. नारायण त्याला आदेश देतात कीं, तुझे काम वेदाची पुनररचना करण्याचे आहे. तू वैराग्यपूर्ण जीवन जगशिल. त्यानंतर तो ऋषी नंतरच्या कल्पात अपंतर-तमस पुन्हा आला त्यावेळी मनुच्या रुपात तो होता. त्याचे तपोसामर्थ्य पाहून नारायण प्रसन्न होतात व त्याला बोलतात, हर कल्पात तू वेदाचे संवर्धन करण्याचे कार्य करशिल. तू तुझ्या चांगल्या कामामुळें नेहमी अद्वितीय असशिल. तुला कोणी हरवू शकणार नाही. जेव्हां कलीयुग येईल भरत वंशात कुरूकुळात तुझ्या कारणाने कांहीं युवराज जन्म घेतील. ते कौरव असतील. ते ख्यातनाम राजे असतील. तुझ्या पासून जन्म झाल्यामुळे त्या कुळात वाद होऊन त्यात त्यांच्या कुळाचा नाश होईल. प्रत्येक युगात तू वेद लोकांपर्यंत नेण्याचे कार्य करशिल. तू मोठा वैरागी असलास तरी तुझे जीवनाबद्दलचे आकर्षण कमी होणार नाही. तू लोकांना मार्गदर्शक असशिल. तुझ्या कौरव पुत्रांचे भले केशव करणार आहे. तू वसिष्ठाच्या मानसपुत्राच्या, पराशराच्या पोटी जन्म घेशिल. तू माझ्या (नारायणाच्या) कृपेने हजारो वर्षाचे आदि आणि भविष्य पाहू शकशिल. त्यात द्वापार युगाच्या अंती व कलियुगाच्या प्रारंभी मी यदू कुळात जन्म घेणार आहेस. ते तू पहाणार आहेस तुझ्या त्या जन्मात. सूर्याचा मुलगा शनि त्या कल्पात मनु म्हणून जन्म घेणार आहे. तो मनु आधीच्या अनेक मनुंपेक्षा जास्त ताकदवान असेल. जे कांहीं येथे घडते माझ्या इच्छेनेच होत असते. त्याप्रमाणे मी जे सांगत आहे तेंच होणार आहे असें नारायण सांगतात. असें बोलून नारायण सारस्वत ऋषीला रजा देतात. पुढे व्यास आम्हाला सांगतात कीं, तो अपंतर-तमस किंवा सारस्वत मींच

होतो. असे होते माझे आधीचे जन्म समजले कां माझ्या प्रिय शिष्यानो. व्यास बोलतात. मींच नारायणाचा अंशावतार आहे व म्हणून मला वेदाची जबाबदारी सोपवली आहे. प्राचीन काळापासून मी तपस्या करत आहे कारण तो माझा स्वभाव आहे. माझ्यावरील तुमच्या प्रेमाखातर मी हे रहस्य तुम्हाला सांगत आहे जे कोणालाही माहीत नाही.

वैशंपायन पुढे सांगतात, आमच्या गुरूचे जन्म मी तुला सांगितले कारण तू विचारत होतास. आणखीन सांगतो कीं अनेक धर्म असतात. प्रत्येकाचे नियम भिन्न असतात. कांहीं सांख्य मानतात तर कांहीं योग मानतात. नारदाने त्यांचा भक्तीमार्गी पंचरत्र सांगितला आहे. त्याशिवाय वेद आणि पशुपत असे आणखीन आहेत. पुढे भविष्यात आणखीन तयार होतील. कपील सांख्य सांगतात. हिरण्यगर्भाने योग सांगितला, नारदाने पंचरत्र सांगितला. ऋषी अपंतर-तमस वेदाचे गुरू आहेत. त्यांना कांहीं प्राचीनगर्भ म्हणून बोलतात. पशुपत महादेवानी सांगितला आहे. त्या कल्पात तो श्रीकांत म्हणून ब्रह्माच्या पोटी जन्मला होता. पंचरत्र नारायणानी सांगितला नारदाला. त्या सगळ्यांचा उद्देश एकच आहे कीं, नारायणाची भक्ती माणसाने करावी. सांगण्याच्या तर्हा विविध परंतु, सांगावयाचे एकच असते. ज्यांना तमोगुणाने व्यापले आहे ते हे कोणतेही पंथ समजू शकणार नाही. नारायणाला समजण्यासाठी तो स्वतामध्ये आहे ते प्रथम लक्षात आले पाहिजे. ते शक्य होते जेव्हां मनुष्य (पंचरत्र व्रताचे नियम असे आहेत) सत्त्वगुणी होतो. त्यासाठी चांगुलपणा, माणूसकी, भूतदया, प्रामाणिकपणा आणि मर्यादा त्याच्या स्वभावात असाव्या लागतात. ते केवळ बाह्यात्कारी (दिखाऊ) असून चालत नाही. ज्याला ते साध्य झाले त्याला नारायण जवळ करतो आणि त्याचे सगळे प्रश्न संपतात. सगळे ज्ञानी ऋषी सांगतात कीं, ही सृष्टी हा निसर्ग हेंच नारायणाचे शरीर आहे. जे कांहीं चांगले आहे व वाईट आहे ते सगळे नारायणाच्याच कृपेने होत असते.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे सत्याहत्तरावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे अठ्याहत्तरावा

जनमेजय विचारतो, "अहो ब्राह्मणा, मला सांगा किती पुरूष आहेत, एक कीं अनेक? अनेक असतील तर त्यातील श्रेष्ठ कोणता? त्या पुरूषांचा स्त्रोत कोणता"?
वैशंपायन सांगतात, "सांख्य आणि योग विचारांत अनेक पुरूषांचा उल्लेख झाला आहे. परंतु, ते उल्लेख सापेक्ष स्वरुपाचे आहेत. मूळात एकच पुरूष असतो परंतु, त्याची विविध रुप निरनिराळ्या संदर्भात दाखवली जातात त्यामुळें ते अनेक आहेत असा गैरसमज होत असतो. त्याबद्दल जास्त सांगणार आहे त्या आधी मी माझ्या गुरूची आराधना करणार आहे. त्या एकाच पुरूषांचे असे विविध अवतार वेदातसुद्धा आढळतात. अध्यात्म विद्येचा अभ्यास करतांना ते सगळे समजून घ्यावे लागते. मी तुला सांगणार आहे व्यासांचे काय विचार आहेत त्या बाबत. जे वेगवेगळे उल्लेख आहेत ते एकाच पुरूषांचे आहेत हे त्या विवेचना नंतर तुझ्या लक्षात येईल. ते समजण्यासाठी फार प्राचीन काळी जो संवाद ब्रह्म आणि महादेव ह्यांत झाला तो सांगतो. विचार सागरात एक उंचापुरा पहाड आहे त्याचे नांव आहे वैजयंता. ब्रह्मदेव नवीन विचार समजण्यासाठी त्या विचारसागराच्या मध्ये असलेल्या वैजयंताकडे जात असतं. चतुर्मुखी ब्रह्म तेथे निवांतपणे बसले होते तेव्हां तेथे महादेव जो त्यांच्या कपाळातून बाहेर आला होता भटकत भटकत त्यांच्या जवळ जातो. तेथे गेल्यावर तो ब्रह्माची पादपुजा करतो. ब्रह्मा त्याला डाव्या हाताने उठवतो. त्यानंतर महादेवाला बोलतो, "तुझे कल्याण हो, बर्याच अवधीनंतर आपण भेटत आहोत. तुझी तपस्या उत्तम असेल असे समजतो". रूद्र बोलतो, "आपल्या कृपेने माझी तपस्या चांगली होत आहे. वेदाचा अभ्यास सुद्धा चांगला आहे. विश्वाचे कार्यसुद्धा बरे चालले आहे. मी आपल्याला आपल्या घरी पाहिले होते थोड्या अवधीपूर्वी व आता आपण येथे आला अहात काय विशेष गोष्ट आहे कां? अशारितीने घर सोडून अशा एकांतात येण्याचे प्रयोजन मला समजेल कां? कांहीं खास कारण असणार असे मी समजतो. आपल्या घरात सगळी सुख आहेत, तेथे देव आणि असुर दोघे रहात असतात. तेथे महान ऋषीसुद्धा आहेत. त्याशिवाय मनोरंजनासाठी गंधर्व आणि

अप्सरा आहेत. असे सुख दायी घर सोडून अशा एकांत ठिकाणी आपल्याला कां यावे असे वाटले त्याबद्दल मला कुतूहल वाटत आहे".

ब्रह्मदेव बोलतात, "खरे तर हा वैजयंता पहाड हे माझे खरे घर आहे. येथे येऊन मी एकचित्त करून विचारसागरातून नवीन विचार मिळवत असतो. ही सृष्टी चालवण्यासाठी ते आवश्यक आहे. आणखीन येथे बसून मी त्या पुरूषांचे ध्यान करत असतो जो विश्वाचे मूळ कारण आहे".

रूद्र बोलतो, "आपण स्वयंभू अहात. अनेक पुरूष आपण उत्पन्न केले आहेत आतापर्यंत. परंतु, तो विश्वाचे मूळ असलेला पुरूष वेगळा आहे असे वाटते. म्हणून तुम्ही त्याचे ध्यान करत अहात कां? मला ह्या विश्वाचे करण असलेल्या आदि पुरूषाबद्दल उत्सुकता वाटत आहे. हा कोण आहे आदि पुरूष? मला त्या बद्दल जास्त सांगून माझी उत्सुकता पूर्ण कराल तर बरे होईल".

ब्रह्मदेव त्यास सांगतात, "तुला कित्येक पुरूष (आत्मे) जे मी तयार केले ते माहीत आहेत. परंतु, हा आदिपुरूष अव्यक्त असून त्याने मला तयार केले आहे त्याच्या इच्छेतून जेव्हां त्याने हे विश्व त्याच्या कल्पनेने घडवले. म्हणून त्याला आदिपुरूष म्हणतात. ते पुरूष ज्यांच्याबद्दल तू बोलतोस ते व्यक्त स्वरुपातील आहेत ज्यांना तू ओळखतोस. जेव्हां त्या अनेक गुणकर्मधारी पुरूषांचे ते गुण लुप्त होतात तेव्हां त्यात हा अव्यक्त आदिपुरूष बसलेला तुला दिसेल.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे अठ्याहत्तावा संपला.

## मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे एकोणऐंशावा

ब्रह्मदेव पुढे सांगतात, "ऐक माझ्या मुला, ह्याचे वेगळेपण त्या अज्ञानमुलक आत्मारुपी पुरूषापेक्षा कसे आहे ते सांगतो. आदिपुरूष अक्षर आहे, अभेद्य आहे, तो ज्ञानी आहे. तो अनंत आहे. तो सर्वव्यापी आहे. आदिपुरूष केवळ ज्ञानाने समजता येतो. जरी त्याची असंख्य रुप असली तरी तो ज्या शरीराच्या भोवती प्रभावळीच्या रुपात असतो ते शरीर त्याला स्पर्श करू शकत नाही. शरीरा भोवती असलेल्या त्याला अंतरात्मा म्हणतात. तो शरीराभोवती असून त्या प्राण्याच्या सगळ्या कृत्यांचा व विचारांचा साक्षिदार असतो. परंतु, तो त्यात सहभागी मात्र नसतो. त्या शरीराच्या सगळ्या कृत्यांसाठी जी अध्यात्मिक उर्जा लागते ती तो पुरवत असतो. कारण तो अध्यात्मिक उर्जेचा अखंड स्रोत असतो. शरीराशी निगडीत असलेल्या सहा लोकपाल देवतांपैकी तीन देवता अग्नी, वरूण (जल) आणि वायू त्याचे मदतनीस असतात. त्यांच्या मुळें ते शरीर सचेतन असते. हे झाले अंतरात्म्याचे. वैश्विक पुरूषाचे कसे असते ते सांगतो, विश्व त्याचे डोके असते. तेंच त्याचे हात असतात, तेंच त्याचे पाय असतात, विश्व त्याचे नेत्र असतात, विश्व त्याचे नाक असते, असा तो त्या विश्वात भ्रमण करत असतो सदोदीत. विश्व त्याचे क्षेत्र असते व तो त्याचा क्षेत्रज्ञ असतो. जसे अंतरात्मा शरीराचा क्षेत्रज्ञ असतो. कोणाला समजत नाही तो त्या शरीराभोवती कसा आणि केव्हां झाला व केव्हां व कां ते सोडून जातो. सांख्य आणि योगी समजतात कीं, कांहीं विशिष्ट अनुष्ठानाने ते त्यांना शोधता येते. परंतु, त्याची निश्चिती नसते. माझ्या आकलन क्षमतेनुसार जे मला सांगणे शक्य आहे तेवढे सांगितले. सूज्ञ सांगतात की, तो एकच आहे जरी अंशात्मकतेने तो सगळ्या चराचरांत विभागलेला असतो. कांहीं त्याला महापुरूष म्हणतात तर कांहीं आदिपुरूष म्हणतात. सर्व चराचरातील तो म्हणजे

अंतरात्मा त्याच रुप असते. जसे एक ज्योत आणि होम हे एकाच अग्नीतत्त्वाचे रूप असते तसेंच कांहींसे ते असते. एका सूर्याचे किरण सर्वत्र फेकले जातात ते किरण आणि सूर्य हे एकच असतात तसे पुरूष आणि अंतरात्मा ह्यांचे नाते असते. एका ज्योतीतून असंख्य तशाच ज्योती उत्पन्न करतात तसे ते आहे. त्या सगळ्या ज्योती सारख्याच असतात. तपस्या विविध प्रकारच्या सांगितल्या जातात पण त्यांचे उद्देश एकच असतात. आदिपुरूषातून अंतरात्मा उत्पन्न होत असतो. तरी त्यांत गुणात्मक दृष्ट्या कांहीं भेद नसतो. मात्र ते होतांना अंतरात्म्याला कांही गुण (अहंकार हा त्यातील प्रधान गुण) चिकटतात प्रकृतीच्या प्रभावामुळे जे आदिपुरूषात नव्हते. त्यामुळे त्याचे कार्यक्रम भिन्न होतात. जेव्हां युगांताची वेळ येते ते गुण लुप्त होतात आणि सगळे अंतरात्मे एकजीव असे परमात्म्यात विलीन होतात. जसे नद्यांचे पाणी सागरात मिळून जाते. सांख्य असे समजतात कीं, आदिपुरूष त्याच्या सुक्ष्म रुपात अनिरुद्ध, प्रद्युम्न, शंकरासन आणि वासुदेव अशा रुपात सिद्धांना अनुभवता येतो. कारण त्यांना ती प्रभावळ दिसू शकते. जर ते शक्य झाले तर तशा योग्याला आदीपुरूषाचा सुद्धा अनुभव घेता येतो. आदिपुरूषाची प्रभावळ सर्व विश्वात पसरलेली अशी त्यांना दिसते. जीव जो शरीराचा कार्यकारी भाग आहे त्याला त्या शरीराच्या आत्म्याचा अनुभव तशाप्रकारे घेता येतो असे योगी सांगतात. तो अनुभव मोक्षासारखा असतो असें सांगतात. प्रत्येक अंतरात्मा हा सुक्ष्मसा पुरूष असतो म्हणून असें कांहीं कमी ज्ञान असलेले समजतात किं, असंख्य पुरूष आहेत परंतु, ते अज्ञान आहे. पुरूषाला समजणे हे अंतिम ज्ञान असते. त्याचे गुण असे सांगतात, तो जाणणारा आणि जाणण्याची गोष्ट असतो, तो विचार करतो आणि ज्याचा विचार करतो तेसुद्धा तोंच असतो, तो खातो आणि जे खातो ते सुद्धा तोंच असतो. तो पितो व जे पितो तेसुद्धा तोंच असतो. तो वास घेतो व ज्याचा वास घेतो तेसुद्धा तोंच असतो, तो स्पर्श करतो आणि ज्याला स्पर्श करतो ते सुद्धा तोंच असतो. थोडक्यात तो भोग घेतो व ज्याचा भोग घेतो तेसुद्धा तोंच असतो. असे अद्वैत त्याच्या प्रत्येक गुणांत आढळते. थोडक्यात तो कर्ता, कारण आणि कर्म (परिणाम) असे तिनही असतो. तेंच अद्वैत तत्त्वाचे रहस्य आहे. मी मलाच खातो, मी मलाच पितो, मी माझाच वास घेतो, मी मलाच स्पर्श करतो असे विलक्षण सत्य असते परंतु,

प्रकृतीच्या भ्रम प्रभावामुळें ते वेगळे असल्याचे वाटते म्हणून विश्वात द्वैत आहे असे अज्ञानी लोक समजतात. अशा पुरूषाला गुण असतात आणि नसतात सुद्धा अशी विलक्षण अवस्था असते. अशा पुरूषाला प्रधान असं सांख्य बोलतात. त्यातून महततत्व उत्पन्न होते. तोंच आदिपुरूष असतो. त्याला सूज्ञ अनिरुद्ध म्हणतात. त्याचा वेदांत समावेष झाला. त्यानंतर मोठे ऋषी आणि देवता त्याला आहुति देऊ लागतात. मी ब्रह्म आहे, मी सगळ्या चराचरात असतो. तू सुद्धा नारायणातूनच आला आहेस. नारायणातून सारे विश्व तयार झाले आहे. नारायणाला जसे पाहिजे तसा तो सादर होत असतो. योग आणि सांख्याच्या विचारसरणीनुसार जे योग्य आहे त्याप्रमाणे मी तुला सांगितले आहे. अशाप्रकारे ब्राह्मदेव रूद्राला पुरूषाबद्दलचे सांगतात. सौती तेवढे सांगून थोडावेळ विश्रांति घेतो.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे एकोणऐंशीवा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
# भाग एकशे ऐंशीवा

सौती पुढे सांगतो, "वैशंपायनाने ते जनमेजयाला सांगितले जे नारायणाच्या महत्तेचे विवेचन ब्रह्म रूद्राला करत होता. ते झाल्यावर युधिष्ठीराच्या इतर प्रश्नांवर तो सांगू लागतो. जे भिष्माला त्यांने विचारले होते सगळ्या इतर पांडवांच्या आणि ऋषीमुनींच्या समक्ष. तेव्हां कृष्ण सुद्धा तेथे उपस्थित होता.

सौती सांगतो, वैशंपायन पुढे सांगतात, युधिष्ठीर विचारतो भिष्माचार्यांना, "अहो पितामहा, आपण आम्हाला मोक्षाच्या मार्गातील कर्तव्ये कोणती ती सांगितली आहेत. आता पुन्हा सांगा जीवनातील इतर पद्धतींतील कर्तव्ये कोणती"?

भिष्म सांगतात, जीवनातील सगळ्या आश्रमांसाठी जी कर्तव्ये संहितेने सांगितली आहेत ती प्रामाणिकपणे आचरली तर पुढे मोक्ष मार्ग सुकर होतो असे ऋषी सांगतात. गृहस्थाश्रमी दानं, यज्ञ करतात त्यातून मोठा पुण्यसंच होत असतो. इतर सुद्धा कांहीं आहेत त्यांचे पालन केले तर खूप फायदा होत असतो. कांहींजण त्यातील कांहीं कर्तव्यांचे विशेष समर्थन करतात पण ती सगळी कर्तव्ये सारखीच उपयुक्त आहेत. तू ज्याबद्दल आज विचारत आहेस तो विषय प्राचीन काळी मोठा चर्चेचा विषय होता व त्यावर नारद आणि इंद्र ह्यांच्यात मोठी रोचक प्रश्नोत्तरी झाली होती. महान ऋषी आणि द्रष्टे असे नारद ज्यांचा मोठा नावलौकीक होता तिनही जगात ते सदैव जगभर फिरत असतं. ते सिद्ध होते. त्यांच्या ज्ञानाच्या मर्यादा विशाल होत्या. असेंच एकदा ते भटकत असतांना इंद्राला भेटतात. ते एकमेकांचे अभिनंदन करतात रिवाजाप्रमाणे. नारद त्यांच्या आसनावर बसल्यानंतर इंद्र त्यांना विचारतो कीं, त्यांनी अशी कांहीं गोष्ट पाहिली आहे कां जी विलक्षण आहे? आपण सगळे जग भटकत असता, सगळी चराचर सृष्टी तुम्ही पहाता, त्याकारणांने असे कांहीं नाही जे आपण पाहिले नाही. म्हणून आपण मला तसे कांहीं पाहिले अथवा अनुभवले असेल त्याबद्दल सांगावे. असे विचारल्यावर इंद्र नारदांच्या उत्तराची प्रतिक्षा करत गप्प बसतो.

ते ऐकल्यावर नेहमी प्रमाणे नारद त्यांच्या पद्धतिने सांगू लागतात. ते एक मोठा इतिहास इंद्राला सांगू लागतात. ते इंद्राला बोलतात, "ऐक सांची पति, जे मी सांगणार आहे ते गेल्या कल्पातील ऋषींनी मला सांगितले आहे. त्यांनी जसं सांगितले तसं मी तुला सांगणार आहे. ते एक विशिष्ट दृष्टी ठेवून मला सांगत होते. त्यामध्ये अध्यात्मिक विद्येची अनेक रहस्ये उलगडलेली आहेत. ते ज्याला समजले त्याला सगळे समजले.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे ऐंशीवा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे एक्याऐंशीवा

भिष्म सांगतात, फार प्राचीन काळी एक मोठे नगर होते त्याचे नांव होते महापद्म. ते गंगेच्या दक्षिणेकडील तटावर वसले होते. त्या नगरात एक ब्राह्मण रहात होता जो कर्मठ (तत्त्वनिष्ठ, व्रतस्थ इत्यादि) होता. तो अत्रीच्या कुळातील होता. त्याचा स्वभाव सहृदय होता. जीवनाबद्दलच्या सगळ्या शंकाकुशंका त्याने ज्ञान संपादन करून व चिंतन करून सोडवलेल्या होत्या. त्यांने जीवनाचा जो मार्ग निवडला होता त्याची त्याला पूर्ण कल्पना होती. तो त्याच्या अध्यात्मिक जबाबदार्यांबद्दल पूर्णपणे जागृत होता. त्याचा त्याच्या भावनांवर पूर्ण ताबा होता. त्यामुळे तो क्रोध, मोह, मद आणि मत्सर अशांच्या आहारी जात नसे. तो समाधानी जीवन व्यतित करत होता. त्याचा त्याच्या सर्व इंद्रियांवर पूर्ण ताबा होता. त्याचा बहुतेक समय वेदाचा अभ्यास करण्यात आणि ध्यान साधनेत जात असे. त्या समाजातील सगळे सद्गृहस्थ त्याचा सन्मान करत होते. त्यानें सन्मार्गाने धन जमवले होते. त्याची सगळी वर्तणूक त्याच्या वर्णाला शोभणारी होती. तो ज्या परिवारात होता त्या परिवाराची चांगली ख्याति होती. त्याला अनेक आप्त, इष्ट मित्र होते. त्याची संतति मोठी होती तसेंच त्याच्या भार्यासुद्धा जास्त होत्या. त्याचे वागणे न्यायाचे, निर्दोष आणि सन्माननीय असें होते. आपल्या मोठ्या परिवाराच्या कल्याणासाठी तो अनेक धार्मिक कृत्ये मोठ्या प्रमाणात करत असे. त्याची धार्मिक कर्मकांड त्याच्या कुटूंबाच्या परंपरेतील असतं. त्या परंपरेनुसार तीन विधी त्याला करणे आवश्यक होते. एक जे वेदात सांगितले होते. दुसरे त्या विधी धर्मशास्त्राला धरून होत्या. तिसरे त्या विधी कराव्या ज्या परंपरेने चालू आहेत पण शास्त्रात नाहीत आणि वेदात सुद्धा नाहीत. अशा परिस्थितीत त्या तीन पर्यायांपैकी कोणत्या विधीला प्राधन्य द्यावयाचे असा प्रश्न त्याला नेहमी पडत असे. त्याचप्रमाणे त्यातील काय माझ्या सध्याच्या परिस्थितीत जास्त लाभदायक ठरेल त्याचा विचार तो करत असें. अशा विचारात तो नेहमी गोंधळलेला असें. असें असतांना एकदा त्याच्या घरी एक उच्चकुलिन ज्ञानी ब्राह्मण अतिथी म्हणून आला. तो गृहस्थ त्याचे स्वागत

करतो रिवाजाप्रमाणे. त्यानंतर जसे अतिथी आरामात बसला आहे तो यजमान ब्राह्मण त्याला बोलतो, आपल्या वागण्याने मी फार संतुष्ट झालो आहे तरी मला एक सल्ला हवा आहे तो आपण द्याल तर बरे होईल. माझ्या गृहस्थाश्रमी कर्तव्यांची सीमा झाली आहे म्हणून मी कुटूंबाची जबाबदारी माझ्या ज्येष्ठ पुत्राकडे सोपवून वानप्रस्थाश्रमी जाण्याचा विचार करत आहे. तसे केले म्हणजे मोठे कर्तव्य मी पार पाडले असे होईल. ह्यापुढे मी मोक्ष साधना करण्याचा विचार करत आहे. परंतु, मी माझ्या परिवारात इतका गुंतलो आहे कीं, ते माझ्याने होत नाही. त्याच प्रमाणे माझ्या आयुष्याचा मोठा हिस्सा संपला आहे. मला समजत नाही अशा मोहात अडकलेला मी काय करावे"? यतिसुद्धा त्यांच्या गुजार्यासाठी गृहस्थांवर अवलंबून असतात. म्हणून मला यति होण्याची अजिबात इच्छा नाही. मी माझ्याच घरासमोर भीक मागण्यासाठी उभा राहीन हे मला पटत नाही. अहो माझे अतिथी, आपण मला अशा पेचांतून बाहेर कसे पडावे त्याबद्दल कांहीं सांगू शकाल तर बरे होईल. मी काय करावे ते सांगा.

भिष्म पुढे सांगतात, तो सूज्ञ अतिथी ब्राह्मण ती यजमानाची व्यथा ऐकून मधूर आवाजात त्याला सांगतो, "खरे सांगावयाचे तर मी स्वतः सुद्धा त्याच विवंचनेत फसलेला आहे. जे विचार तुमच्या मनात येत आहेत तेच माझ्या मनात सुद्धा येत आहेत. मी सुद्धा त्या (गृहस्थाश्रमाच्या) मोहात अडकलेला आहे. मला समजत नाही काय करावयाचे"? "स्वर्गात जाण्याचे अनेक मार्ग असतात असें जाणकार सांगतात. मोक्षाकडे जाणारेसुद्धा अनेक मार्ग असतात. यज्ञ करणे हां एकच मार्ग नाही. कांहीं राजाची सेवा करण्यात धन्यता मानतात. कांहीं गृहस्थाश्रमात रहाणे उचित समजतात. कांहीं योग मार्ग स्वीकारतात. कांहीं गुरूच्या आज्ञेत रहाणे श्रेयस्कर समजतात. कांहीं इंद्रियसंयमन करण्याचा मार्ग चांगला समजतात. कांहीं आपल्या मातापित्यांची सेवा करून मातृऋण फेडण्याचा मार्ग योग्य समजतात. कांहीं चांगुलपणाचा सात्त्विक मार्ग पसंत करतात. कांहीं युद्धात मरणे स्वर्गात जाण्यासाठी योग्य समजतात. कांहीं उच्छ व्रत अजमावतात. ज्याला जे योग्य वाटते ते तो करत असतो. त्या त्या विविध मार्गांचे समर्थक आहेत तसेंच विरोधकसुद्धा आहेत. त्यात ब्राह्मणांसाठी वेदाचा अभ्यास करणे, पवित्र जीवन जगणे, श्रेयस्कर समजले जाते. ते सगळे मार्ग स्वर्गात जाण्यासाठी म्हणून सांगितले आहेत. त्यात आपण पहातो कीं चांगुलपणाने रहाणार्यांना

पापी माणस फसवून बरबाद करतात. तेव्हां त्याला देवता मदतीला येत नाहीत मग तो दावा किती विश्वसनीय आहे प्रापंचिकासाठी ह्याचा प्रश्न पडतो. मोठे मोठे दावे चांगुलपणासाठी केले जातात पण प्रत्यक्ष अनुभव वेगळेच सांगत असतो तरी आम्ही ब्राह्मण चांगुलपणा आचरणात ठेवतो कारण तो आपला संस्कार आहे. नेमके काय करणे माझ्यासाठी योग्य हा मला पडलेला प्रश्न आहे. तरी मी चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया व प्रामाणिकरणा सोडणार नाही. तुझा प्रश्न खरोखरच अवघड आहे. माझ्याकडे सुद्धा त्यावर इलाज नाही. म्हणून मी एका ठिकाणी जाऊन कांहीं उपाय मिळतो कां ते शोधण्यासाठी निघालो आहे". अतिथी ब्राह्मण यजमान ब्राह्मणाला सांगत असतो.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे एक्याऐंशीवा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

# भाग एकशे ब्यांऐशीवा

तो अतिथी ब्राह्मण पुढे बोलत असतो, "तरी तू विचारत आहेस म्हणून मी माझे मत सांगतो. ऐक मी काय सांगतो, माझ्या शिक्षकाने मला त्यावर जे सुचवले होते बर्याच वर्षापूर्वी ते मी तुला सांगणार आहे. असे सांगतात कीं, फार प्राचीन काळी चांगुलपणाचे चक्र एका निमिषारण्यात कोणी ऋषीने चालू केले होते. ते अरण्य गोमती नदीच्या तटावर होते. तेथे नागा लोकांचे राज्य आहे. तेथे सगळ्या देवता जमून एक यज्ञ करत असतात. तेथे फार पूर्वी राजा मंधत्री ज्यांने इंद्राचा पराजय केला होता, तो राज्य करत असे. त्या नागा राज्यात ह्यावेळी पद्मनाभ नांवाचा राजा जो मंधत्रीचा वंशज आहे, राज्य करत आहे. त्याला कांहीं फक्त पद्म म्हणून सुद्धा ओळखतात. तो तीन मार्गी धर्म (कर्म, ज्ञान आणि भक्ती) आचरत असतो. त्याप्रमाणे देवाची आराधना करण्यावर विश्वास असलेला आहे. त्यांने सगळ्यांना वचनाने, विचारांने आणि कृत्याने जिंकले आहे. तो चिरकर्णी आहे म्हणून सगळ्या गोष्टींचा पूर्ण विचार करूनच तो निर्णय घेत असतो. त्याचा राज्यकारभार चांगुलपणा, माणूसकी, भूतदया, प्रामाणिकपणा आणि मर्यादा ह्या नौतिक तत्त्वावर चालतो. त्यापेक्षा वेगळे जो वागेल त्याला तेथे शिक्षा होत असें. त्याच्या राज्यातील वाईट लोकाशी त्याचे धोरण चार प्रकारचे होते. ते असे, प्रथम तो समजावतो, त्याने नाही सुधारला तर भेद करणे, तरी नाही सुधारला तर लाच देणे आणि अखेरीस अजिबात सुधारण्यातला नाही असें दिसले कीं, तो त्यांना ठार मारतो. तेथे जर तू गेलास तर कदाचित तो तुला योग्य मार्ग दाखवू शकेल. मीसुद्धा तेथे जाण्यासाठीच माझ्या घरातून प्रयाण केले आहे कारण तुझ्या प्रमाणेच मला सुद्धा ती गृह मोहाची वासना विवंचना बनून राहिली आहे. मी त्या राजाकडे जाऊन त्या मोहावर कसा ताबा मिळवावा ते त्याच्या कडून समजून घेणार आहे. त्या राजा पद्माला अतिथींचे स्वागत करावयाला आवडते. तेव्हां आपण तेथे जाऊ जर तुला ते मान्य असेल". असे तो ब्राह्मण यजमान ब्राह्मणाला सुचवतो. पुढे सांगतो कीं, तो राजा वेदाचा चांगला जाणकार आहे. सगळ्या संहिता तो जाणतो, तो एक गुणी राजा आहे आणि तो गुणीजनांचा चाहता आहे. त्याच्या तपोश्चरणाची मोठी ख्याति आहे. तो

श्रीमंत सुद्धा आहे. तो यज्ञ करतो. ब्राह्मणांना दानं आणि भेटी देतो. तो अहिंसावादी असून कधी कोणावर अन्याय करत नाही. तो क्षमाशिल आहे. त्याची वर्तणूक चांगल्या राजाचे द्योतक आहे. ते सगळे गुण त्यामध्ये आहेत जे एका चांगल्या राजात असले पाहिजेत. तो आपल्याला निश्चितपणे कांहीं मार्ग सांगू शकेल असा मला विश्वास वाटतो. म्हणून मी तेथे जाण्यासाठी निघालो आहे. जर तुला पटत असेल तर आपण दोघे तेथे जाऊन राजा पद्माची कृपा प्राप्त करून घेऊ.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे ब्याऐंशीवा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
# भाग एकशे त्र्यांऐंशीवा

यजमान ब्राह्मण त्यावर बोलतो, आपल्या बोलण्याने माझ्या मनावरील मोठा बोजा उतरला असें वाटत आहे. खूप मोठा पल्ला चाललेल्या वाटसरूला विश्रांति घेण्यासाठी बिछाना मिळावा असे झाले आहे. बराच वेळ उभा असलेला बसण्यासाठी जागा मिळाली तर त्याला कसे वाटावे असे वाटते तुमच्या बोलण्यामुळे. तहानलेल्याला थंड पाणी मिळाले तर जसे वाटते तसे मला वाटत आहे. उपाशी माणसास भरपेट खाणे मिळाले तर त्याला जो आनंद होईल तसा आनंद मला वाटत आहे. भुकेल्या अतिथीला त्याच्या आवडीचा आहार मिळाला तर त्याला जो आनंद वाटतो तसे माझे झाले आहे. निपुत्रिकाला पुत्र झाल्याने जो आनंद होतो तसा आनंद मला वाटत आहे. अशाप्रकारे माझे झाले आहे तुमचे बोलणे ऐकण्यामुळे. आपल्या बोलण्यातून मी काय घ्यावयाचे ते आता ठरवत आहे. प्रथमदर्शनी आपला सल्ला मी स्वीकारत आहे आणि त्याप्रमाणे मी त्या पद्मनाभ राजाच्या कडे मार्गदर्शनासाठी जाण्याचा विचार करत आहे. आपण दोघे उद्या भल्या पहाटे सूर्य उगवण्या आधी त्या राजाच्या गांवाला निघू.

भिष्म पुढे सांगतात, तो विद्वान अतिथी ब्राह्मण त्याच्या यजमानाबरोबर गप्पा मारत ती रात्र तेथे काढतो. ते दोघे चौथ्या आश्रमाबद्दल (सन्यासाश्रम) बोलत होते ज्यात जाण्यास ते मनाने तयार नव्हते. त्या आश्रमातील समस्या आणि त्या उलट गृहस्थाश्रमाचा आराम अशी ते तुलना करत होते. कांहीं करून गृहस्थाश्रमातच रहाण्याचा ते दोघे निर्धार मनाशी करत असतात. त्यात त्यांना केव्हां निद्रा देवतेने तिच्या बाहूत घेतले ते समजलेसुद्धा नाही. पहाटे उठल्यावर ते ब्राह्मणांचे प्रातर्विधी उरकतात. सूर्य उगवण्या आधी त्या दिवशी ते भल्या पहाटे उगवत्या सूर्याचे कोवळे किरण अंगावर घेत गोमती नदीच्या दिशेने निघतात. ते मोठ्या निर्धाराने पद्मराजाकडे जात असतात. यजमान ब्राह्मण आपल्या प्रियजनांचा निरोप घेतो. मागे वळून न पहाता ते नागाराज्याकडे चालू लागतात.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे त्र्यांऐंशीवा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग एकशे चौर्याऐंशीवा

भिष्म पुढे सांगतो, ते दोघे अनेक रमणीय वन प्रदेशांतून तलाव, नद्या, झरे असें ओलांडत अनेक तीर्थक्षेत्रे पहात अखेरीस एका बैराग्यांच्या आश्रमापर्यंत पोहोचतात. तेथे तो त्या नागा राज्याबद्दल विचारणा करतो. त्याप्रमाणे त्याला दिशा समजत होती व त्यानुसार तो पुढचा प्रवास करत असतो. असें करत तो त्या नागाच्या ठिकाणी पोहोचतो.

त्या निवास स्थानी गेल्यावर रिवाजानुसार तो मोठ्याने ओरडून सांगतो कीं, तो का आला आहे व तो कोण आहे. त्याचे बोलणे ऐकल्यावर राजाची पत्नी त्याचे स्वागत करते. विचारते कीं, ती त्यांच्यासाठी काय करू शकेल"? तो त्याचा राजाला भेटण्याचा उद्देश सांगतो.

ते ऐकल्यावर राजाची सुस्वरुप पत्नी ब्राह्मणांला सांगते कीं, तिचा पति सुर्याचा रथ खेचण्यासाठी गेला आहे आणि तो आणखीन पंधरा दिवस येणार नाही. ते ऐकल्यावर तो ब्राह्मण तिला सांगतो कीं, तो व त्याचा मित्र राजा येण्याची वाट पहात गोमती नदीच्या किनार्यावरील अरण्यात रहाणार आहोत. तो तिला विनंती करतो कीं, राजाला त्यांच्या येण्याची खबर तो आल्यावर द्यावी त्या प्रमाणे त्या ब्राह्मणांना सुद्धा राजा आला कीं, कळवावे.

असें सांगून ब्राह्मण तेथून निघतात आणि नदी किनारी असलेल्या अरण्याकडे जातात. राजाच्या पत्नीला काळजी वाटते कीं, हे ब्राह्मण तेथे त्या अरण्यात खाण्याशिवाय कसे रहाणार आहेत. ती तिच्या माणसांना त्या ब्राह्मणांबद्दल सांगते.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे चौर्याऐंशीवा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे पंच्याऐंशीवा

भिष्म पुढे सांगतात, त्या नगरातील नागा ते समजल्यावर कीं, दोन ब्राह्मण राजाला भेटण्यास आले असून ते आता राजाची येण्याची वाट पहात नदी किनारी उपाशी रहात आहेत. राजा पद्माचे सगळे आप्त त्यांच्या मुलाबाळांसह त्याला पहाण्यासाठी नदी किनारी जमा होतात त्या ब्राह्मणांना पहाण्यासाठी. ते पहातात कीं, ते ब्राह्मण तेथे ध्यान लावून बसले आहेत व कांही मंत्र जपत आहे. त्याच्या कडे पाहून ते समजतात कीं, ते अन्नपाण्याशिवाय उपाशीच तेथे बसलेला आहे. ते मोठ्या आदरपूर्वक त्या ब्राह्मणांना दोनही हात जोडून विनंति करतात कीं, ते अतिथी अशारितीने अन्नाविना रहाणे त्यांच्या नगराच्या इभ्रतीला शोभणारे नाही. तरी त्यांनी अन्न ग्रहण करावे. फळं, कंदमुळं, शिजलेले ताजे गोमांस असे कितीतरी खाद्य पदार्थ ते त्या ब्राह्मणांच्या उदरनिर्वाहासाठी आणून देऊ इच्छितात. त्यातील जे चांगले वाटेल ते त्याने स्वीकारावे. जर आपण ते नाही ग्रहण केले तर आम्हाला ब्राह्मण हत्त्येचे पातक लागेल व ते आम्ही कधीच मान्य करणार नाही. असे पातक आजवर आमच्या येथे झालेले नसल्यामुळे येथे लहान मुलं मरत नाहीत, वडिलांच्या आधी मुलगा मरत नाही, आमच्या येथे कोणीही अतिथी उपाशी राहिला असे आजवर कधीही झालेले नाही. अतिथीस उपाशी ठेवून स्वतः अन्नग्रहण करण्याची आमची संस्कृती नाही. असें बोलून ते सुसंस्कृत नागा लोक ब्राह्मणांच्या प्रतिक्रियेची प्रतिक्षा करत तेथे होत जोडून उभे ऱहातात.

ते ऐकल्यावर समाधानाने ते व्रतस्थ ब्राह्मण त्यांना नम्रपणे सांगतात कीं, "आज सहा दिवस आम्ही अनशन करत आहोत राजाच्या प्रतिक्षेत आणि त्यात त्या लोकांचा कांहीं दोष नाही म्हणून ते विनाकारण स्वताला त्रास करून न घेतील तर ते उचित होईल". ते पुढे सांगतात कीं, "राजा आणखीन अकरा दिवसानंतर येणार असे त्यांना सांगितले आहे राणीसरकारने तर तो त्या वेळे पर्यंत त्याचे अनशन राखणार आहे". ते पुढे सांगतात कीं, "ते अनशन त्यांने राजाच्या सुखासाठी धरलेले आहे म्हणून त्याबद्दल ते नागा लोक निश्चिंत रहातील

तर ते योग्य होईल आणि जर राजा त्या ठरलेल्या मुदतीत परत आला नाही तर मात्र आम्ही, तुम्ही जे खाणे द्याल ते ग्रहण करून आमचे अनशन सोडू". पुढे ते ब्राह्मण त्यांना सुचवतात कीं, राजा आला तर ते त्यांना सांगतील म्हणजे ते त्याचे उपोषण थांबवतील. ते ऐकल्यावर ती नागा मंडळी समाधानाने तेथून निघून जातात.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे पंच्याऐंशीवा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
# भाग एकशे श्याऐंशीवा

भिष्म पुढे सांगतो, पंधरा दिवस झाल्यानंतर तो पद्मनाभ राजा सूर्याची परवानगी घेऊन घरी परत येतो. त्याला आलेले पाहून त्याची पत्नी त्याला हात पाय तोंड धुण्यासाठी पाणी देते. ते सोपस्कार उरकल्यानंतर ती त्याच्या बरोबर बसून इतर वार्ता करू लागते. राजा त्याला दिलेले न्याहरी खाऊन थोडा विश्राम करत असतो तेव्हां त्याची राणी त्याला त्या पंधरा दिवासांत काय घडले ते सांगू लागते. तो तिला विचारतो कीं, ती चांगुलपणाने, माणूसकीने व भूतदया आणि प्रामाणिकपणा ह्यांचे पालन करून तिचे कार्य करत होती कां"?

त्याची राणी इतर गोष्टीं सांगितल्या नंतर राजाला सांगते कीं, कोणी दोन ब्राह्मण त्याला भेटण्यास आले होते. त्यांनी त्यांचा राजाला भेटण्याचा उद्देश मात्र तिला सांगितला नाही परंतु ते राजाच्या येण्याची प्रतिक्षा करत गोमती नदी किनार्याच्या अरण्यात तपस्या करत रहाणार आहेत. राजा आला कीं, त्याची खबर त्याला सांगावी अशी विनति त्याने केली आसल्याचे ती राजाला सांगते. ते मोठे कर्मठ ब्राह्मण असावेत असें त्यांच्या वर्तनावरून दिसत होते असें ती राजाला सांगते. त्याप्रमाणे आता तुम्ही आला अहात तेव्हां त्याची खबर त्याला देण्याची व्यवस्था करावी लागेल असे ती राजाला सांगते.

ती पुढे राजाला सुचवते कीं, तो त्या ब्राह्मणांना जे पाहिजे ते देईल तर बरे होईल कारण, ते सध्या तुमच्या भल्यासाठी तेथे नदी किनार्याच्या अरण्यात तपस्या आणि अनशन करत बसले आहेत.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे श्याऐंशीवा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे सत्याऐंशीवा

नागा राजा बोलतो, "अहो माझी राणी, तुझे स्मित फारच सौख्यकारक आहे. तू ज्याला पाहिले आहे ते कोणी खरेच ब्राह्मण आहेत कीं, कोणी देवता माझी व तुझी परीक्षा पहाण्यासाठी आले आहेत"? राजा तिला बोलतो असे कोण आहेत हे कीं, ते तिला सांगतात कीं, राजा आला कीं, त्याने त्याला भेटण्यास त्याच्याकडे अरण्यात जावे"? अशी भाषा एक तर देवता किंवा असुर करत असतात. किंवा कोणी देवर्षी असावेत. त्या राजाचा अहंकार दुखावला जातो कारण कोणी मामुली ब्राह्मण त्याला अरण्यात भेटावयाला बोलावतात म्हणजे ते कोणी असुरच असले पाहिजेत ब्राह्मणांच्या वेशात.

राजाचा क्रोध राणीला समजतो. ती सांगते कीं, त्याचा कांहीं गैरसमज झाला आहे. तिच्या मते ते दोन नेक इन्सान असून त्यांचा इरादा कशाही प्रकारचा वाईट असणे शक्य नाही. तरी उगाचच शत्रू छुप्या रुपात आला आहे असे न समजता त्यांना चांगल्या प्रकारे भेटणे योग्य होईल आणि तो असेंही बोलला आहे कीं, त्याला आपल्या आगमनाची वार्ता द्यावी म्हणजे ते स्वतः तुम्हाला भेटण्यास येऊ इच्छितात. ती पुन्हा बोलते कीं, ते दोन वृद्ध ब्राह्मण आहेत त्यांने संन्यास घेतला असावा अशा परिस्थितीत उगाचच कांहीं विपरित विचार करणे आपल्याला शोभणार नाही. तरी आपण न जाता त्याला आपल्या येण्याची वार्ता फक्त कळवावी व पहावे ते काय करतात"? त्याचे वागणे, वेषभूषा, त्याची भाषा असे सगळे फार सुसंस्कृत होते. आपण प्रथम शांत व्हा, असे राणी राजाला विनवते. ती परोपरीने राजाला सांगते कीं, त्यांच्या बोलण्याच्या पद्धतीवरून स्पष्ट होत होते की, ते आपल्याकडे मदतीच्या आशेने आले आहेत. म्हणून त्याच्याशी प्रथम सामोपचाराने आपण जाल जे आपले धोरण आहे. जसा चातक पक्षी पावसाच्या अपेक्षेने आकाशाकडे पहात ओरडत असतो, जसा शेतकरी पावसाच्या आशेने आकाशाकडे पहात असतो तशी त्याची दृष्टी होती हे मी खात्रीने सांगू शकते. त्याचे कोणत्याही प्रकारे आपल्या हातून नुकसान होऊ देऊ नका आतापर्यंत आपल्या कडे आलेला याचक कधी रिक्तहस्ते गेलेला नाही

तसे हे ब्राह्मणसुद्धा समाधानाने येथून गेले पाहिजेत असें मला वाटते. त्याचे अश्रू पुसण्याचे, खर्या राजाचे, खर्या क्षत्रियाचे कर्तव्य आपण पूर्ण करावे. खोट्या समजाने कांहीं खोटा हेत्वारोप करू नये अशी राणी पद्मनाभाची कानउघडणी करते. त्याला कांहीं दानाची अपेक्षा असेल तर ते द्यावे. कांहीं प्रश्न असेल तर त्याची चर्चा करावी जसे तुम्ही तुमच्याकडे येणार्याबरोबर नेहमी करत असता तसेंच ह्याच्याशी आपण एका खर्या राजासारखे वागावे, राणी तिच्या पतीला सांगते. तसे केल्याने एका ब्राह्मणाचा दुवा तुम्हाला मिळले. त्याच्याशी चांगले वागून तुम्ही तुमचे व तुमच्या परिवाराचे कल्याण करणार अहात. तो खरा मार्ग आहे एका राजासाठी राणी सांगत असते.

राजा नागा तिला बोलतो, "माझा उद्देश उद्धटपणाचा नव्हता. मी फक्त एका राजाने जी सावधानता बाळगली पाहिजे त्याचा उल्लेख केला होता. मी तुझ्या आज्ञेत असतो हे तू चांगलेच समजतेस. मी क्रोधाचे समर्थन करणारा नाही. मला माहीत आहे रावणाचे काय झाले त्याच्या क्रोधामुळे. त्यांने इंद्राला आव्हान दिले आणि अखेरीस तो रामाच्या अपकृपेने बरबाद झाला. माझे असे कांही होणार नाही ह्याची निश्चिती तुझ्या मनात असू दे. कार्तवीर्याचे अविचाराने काय झाले मला माहीत आहे प्रिये. त्याचा नाश झाला परशूरामाच्या हातून. मी तुला वचन देतो कीं मी त्या ब्राह्मणांना सर्वप्रकारची मदत करीन. तुझ्या सारखी दूरदृष्टी असलेली जीवनसाथी देवांने मला दिली म्हणून मी ब्रह्माचे किती आभार मानू असे राजा तिच्या कौतुकाचे बोलतो.

आता मी कोणत्याही प्रकारचा संकोच न बाळगता त्या ब्राह्मणाला भेटण्यास जाणार आहे. तेथे मी त्याच्याशी शिष्टाचाराच्या नियमानुसार बोलणार आहे त्याबद्दल तू निश्चिंत रहा. मी त्याच्या सगळ्या विवंचना दूर करणार आहे जसे मी नेहमी करत असतो.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे सत्यांऐंशीवा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे अठ्याऐंशीवा

भिष्म पुढे सांगतो, "असे आपल्या प्रिय पत्नीला बोलल्यानंतर तो नागा राजा त्या ब्राह्मणाच्या ठिकाणी जाण्यासाठी निघतो. त्याची खबरबात विचारण्याचा त्याचा इरादा असतो. जात असतांना तो स्वताशीच विचार करत असतो कीं, काय काम काढले असेल ह्या द्विजानी माझ्याकडे"? त्या ठिकाणी तो पोहोचतो, त्याच्या सदाचारी वर्तणूकीप्रमाणे तो ब्राह्मणाला बोलतो, "अहो महाजन, रागावू नका. मला येण्यास विलंब झाला आहे. आपण शांतपणे बोलू. येथे येण्याचे आपले प्रयोजन काय ते समजले तर बरे होईल. मला शांतपणे सगळे सांगा. येथे गोमतीच्या किनारी कोणत्या देवतेची आराधना आपण करत अहात"?

यजमान ब्राह्मण सांगतो, "माझे नांव धर्मारण्य आहे. मी येथे राजा पद्मनाभा ह्याला भेटण्यास आलो आहे. जे फार मोठे सूज्ञ म्हणून ख्यातनाम आहेत. त्यांचे नांव राजा पद्मनाभ आहे. त्यांच्याशी मला कांहीं बातचीत करावयाची आहे. मला सांगण्यात आले कीं, ते सध्या इंद्राचा रथ खेचण्यासाठी गेले आहेत. तेव्हा ठरवले कीं, त्यांच्या घरी न रहाता ह्या एकांत ठिकाणी ध्यान करण्यात आपला समय व्यतित करावा म्हणून मी व माझे स्नेही गोमति किनारी ह्या अरण्यात तपस्या करत बसलो आहोत त्यांची वाट पहात. जसा चातक पक्षी पावसाच्या पाण्याची प्रतिक्षा करतो तसे आम्ही त्यांची प्रतिक्षा करत आहोत. जर ते आले असतील तर मी त्यांना भेटण्यासाठी त्यांच्या निवासस्थानी जाऊ इच्छितो. त्यांचे भले व्हावे म्हणून आम्ही येथे ध्यान जप करत आहोत. त्यात आमचा समय चांगला जात आहे. कधीही कोणाचेही भले करावयाचे असते असे वेद सांगतात मी त्याचे पालन करत आहे. मला त्यात संतोष मिळतो".

ते ऐकून राजा पद्मनाभ बोलतो, "खरोखरच आपण खूप चांगले गृहस्थ दिसता. पवित्र आणि सश्रद्ध सुद्धा अहात. म्हणजे आपण चांगुलपणाचा धर्म पाळत अहात हे समजले. अहो ब्राह्मणा, तुमचे जेवढे कौतुक करावे तेवढे कमी होईल. आपण राजा पद्माबद्दल फार चांगली प्रतिमा मनात ठेवून आला अहात. मला सांगा, मी आपल्यासाठी काय करावे असे तुमचे मत आहे. मी राजा पद्मनाभ आहे. मला तुमच्या बद्दल माझी पत्नी बोलली. म्हणून

मी स्वतः आपल्याला भेटण्यास आलो आहे. आपण एवढ्या प्रेमाने माझ्याकडे आला अहात ती तुमची इच्छा मी पूर्ण करणार आहे. आपण जे काम मला सांगाल ते मी करीन. आपल्या उत्तम वागणूकीने आपण आम्हाला आपल्या आधीन केले आहे".

यजमान ब्राह्मण बोलतो, "अहो तुमचे कल्याण हो. मी आपल्याकडून कांहीं मार्गदर्शन घेण्यासाठी आलो आहे. माझे ज्ञान त्यात कमी पडले म्हणून आपल्याला भेटण्यास आलो आहे. अहो नागा राजे, मी केवळ जीवात्म्याच्या पुष्ठीने मोक्ष साधना करण्याचा प्रयास करणार आहे त्या बद्दल आपले काय मत आहे ते मला समजून घ्यावयाचे आहे. मी ह्या जगाशी फार जुडलेला अथवा फार विभक्त असा दोनही नाही. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे मला अजून गृहस्थाश्रमा बद्दल मोह आहे. त्या मोहातून मी कसा मुक्त होईन ह्याची चिंता मला सतावत आहे. जोवर मी त्या मोहातून मुक्त होत नाही, माझा वानप्रस्थाश्रम सुरळीतपणे होणार नाही त्याची मला चिंता खात आहे. तरी कोणी ब्राह्मणांने जो माझ्याकडे अतिथी म्हणून आला होता त्यांनी सांगितले कीं, आपण सूज्ञ अहात, आपण योगसिद्ध अहात, आपण हवा खाऊन राहू शकता असें मी ऐकत आहे. म्हणून आपण ह्या विषयी मला कांहीं सांगू शकाल, असें मला समजले म्हणून आम्ही आपल्याला भेटण्यास आलो आहोत. त्या बद्दल मला आपण मार्गदर्शन केल्यानंतर इतर गोष्टींची चर्चा करू.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे अठ्ठ्याऐंशावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे एकोणनव्वदावा

तो ब्राह्मण बोलतो, "मला उत्सुकता झाली जेव्हां समजले कीं आपण विवस्वाताचा रथ खेचण्यासाठी गेला अहात. ह्यावेळी आपली पाळी होती ते करण्याची हे समजलो. जर हरकत नसेल तर मला तुमच्या त्या अनुभवाबद्दल कांहीं समजले तर बरे होईल.
नागा त्याच्या घोघर्या परंतु, श्रवणीय आवाजात सांगू लागतात. सूर्यदेव सगळ्या चराचराचे उगमस्थान आहे. अगणित मुनी, त्यांच्या वैराग्याने परिपूर्ण असे त्याशिवाय असंख्य देवता ज्या सूर्याच्या किरणात असतात, बलशाली वायूदेव, असे विलक्षण सगळे सूर्याच्या प्रकाशाच्या आधारे असतात. सूर्य वायूदेवाचे अनेक भागात विभागलेले हिस्से सगळ्या सृष्टीवर पसरवून कितीतरी गोष्टी साध्य करत असतो. जसे पाऊस पाडणे, त्यामुळे मोसम तयार करत असतो. हे सगळे तो जीवांच्या संवर्धनासाठी करत असतो. सूर्याच्या किरणांमुळें समुद्रातून काळी ढगं तयार होतात. त्याच्यातून पर्जन्य आणि दंव पृथ्वीवर येत असते व त्या प्रकारे सगळी जमीन भिजत असते. वर्षाचे आठ महिने तो समुद्रातून पाणी ओढत असतो त्याच्या शक्तिमान किरणांच्या मदतीने व ते पाणी चार महिन्यात जमिनीवर तो टाकत असतो. त्यातून विविध ऋतू तयार होत असतात. असे म्हणतात कीं, त्याच्या किरणात विविध प्रकार आहेत व त्यातील कांहींमध्ये परमात्मा (चैतन्य) निवास करत असतो. त्यामुळे त्या किरणांच्या प्रभावातून पृथ्वीवर चैतन्यमय सजीव सृष्टी तयार होत असते. सूर्याच्या आकर्षणामुळें पृथ्वी आकाशात अधांतरी धरलेली असते. असें हे सगळे अनाकलनीय परंतु, विलक्षण कर्तृत्व सूर्यात आहे. अहो ब्रह्मणा, तो आदिपुरूष जो अनादी अनंत आहे, त्या सूर्यात असतो असें आम्ही समजतो. आणखीन एक विलक्षण गोष्ट घडली ह्यावेळी तिच्या बद्दल सांगतो ते ऐक, मी काय सांगतो ते, ते चमत्कारातील चमत्कार आहे. जे मी निरभ्र आकाशात पहात होतो. माझ्या सूर्याशी असलेल्या घनिष्टतेमुळे ते मला अवगत झाले. त्या दिवशी दुपारच्या प्रहरी जेव्हां सूर्य त्याच्या उच्चीचा असतो जेव्हां तो कमाल उष्णता पृथ्वीवर सोडत असतो, आम्ही एक गोष्ट सूर्याकडे येत असलेली पाहिली.

त्याचे तेज सूर्यापेक्षा कांहीं कमी नव्हते, त्याच्या प्रकाशाने सगळे आकाश चमकू लागले. यज्ञात तुपाची धार धरल्याने यज्ञाचा अग्नी जसा तेजाने भडकून उठतो तसा तो होत होता. त्याच्याकडे आम्ही पाहू शकत नव्हतो. दुसरा सूर्य होता जणूकाय. तो सूर्याजवळ आल्यावर तो त्याचे अनेक हात सूर्याला मिठी मारण्यासाठी पुढे करतो. त्यानंतर तो सूर्याच्या तबकडीत (गोलात) शिरतो. तो सूर्याशी एकरुप होतो. तो कोण होता आम्हाला काही समजले नाही. आम्ही सूर्याचा रथ खेचणारे पार गोंधळून गेलो होतो. आम्ही सूर्यदेवाला विचारू लागलो, "हा कोण होता जो तुमच्यात मिळून गेला"?

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे एकोणनव्वदावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
# भाग एकशे नव्वदावा

सूर्य सांगतो, "हा कोणी अग्नीदेव अथवा बलशाली असुर नव्हता. तो नागासुद्धा नव्हता. तो होता एक ब्राह्मण ज्याने उंच्छ व्रतात राहून अध्यात्मिक उत्कर्ष साध्य केला आहे. त्याने शेतात शेतकर्यांने सांडलेले धान्य गोळा करून त्यावर उदरनिर्वाह करत तपस्या केली आहे. तो मातीत पडलली फळं, खाण्य योग्य पानं, कंदमुळं आणि शेतात पडलेले उच्छ धान्य वेचून ते खाऊन तपस्या केली होती म्हणून तो ह्या उच्च पदाला पोहोचला कीं, माझ्यात येऊन मला मिळाला. कांहीं नाही मिळाले तर तो पाणी पिऊन रहात असे. त्याला कसल्याही गोष्टीचा मोह उरला नव्हता. महादेवांनी त्याची तपस्या मान्य केली. ते त्याच्यावर प्रसन्न झाले. कारण तो वेदाच्या संहिता अखंडपणे गात होता. तो त्याचा जपयज्ञ होता. जो यज्ञ सर्वश्रेष्ठ समजला जातो. स्वर्गात जाण्यासाठी तो मार्ग त्याने चोखाळला होता. आता तो स्वर्गात माझ्या माध्यमाने गेला आहे. त्याने कधी धन जमवले नाही. तो सदैव निरपेक्ष होता. तो वेदात दिलेले उंच्छ व्रत आचरत होता. अहो सूज्ञ ब्राह्मणा, तो ब्राह्मण सगळ्यांच्या भल्याची इच्छा धरून होता. उंच्छ व्रताने तपस्या करणारा कोणत्याही नागा पेक्षा, गंधर्वापेक्षा, असुरापेक्षा, देवते पेक्षा श्रेष्ठ असतो. अहंकाराचा बिमोड करण्यासाठी ह्याच्यापेक्षा चांगली साधना नसते. तो प्रसंग मी विसरू शकत नाही. असे ब्राह्मण सूर्याच्या गोला बरोबर आकाशात अनंतकाळ भ्रमण करत रहातात".

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे नव्वदावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे एक्याण्णवावा

तो ब्राह्मण बोलतो, हे खरोखरच विलक्षण आहे. ते ऐकून मला माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळाले आहे असे वाटते. मला वाटते, ह्या कथेच्या माध्यमातून आपण मला माझ्या पुढच्या कर्तव्याची कल्पना नकळत दिली आहे. माझ्यावर आपली कृपा झाली व ही कथा सांगितली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. आता मला गेले पाहिजे. मला आशा आहे कीं, आपण मला विसरणार नाही आणि वेळोवेळी माझी चौकशी कराल आपल्या सेवकांच्या द्वारा.
नागा राजा बोलतो कीं, अजून तुझे प्रश्न राहिले आहेत त्यांची चौकशी पूर्ण करून मगच तू अरे ब्राह्मणा, येथून जाशिल तर ते जास्त योग्य होईल. ते ऐकल्यावर धर्मारण्य राजाला सांगतो कीं, "कांही प्रश्न मला सतावत असतात जरी माझा आगम शास्त्राचा अभ्यास झाला आहे तरी आपण विचारता म्हणून मी माझे प्रश्न विचारतो. अरे राजा पद्मनाभा, मला सांगा, गुन्हा आणि पाप ह्यात काय भेद असतो. गुन्ह्याला राजा शिक्षा करतो व पापाला यम शिक्षा करतो त्यातील फरक व साम्य काय ते मला समजावू सांगा".
पद्मनाभ राजा सांगतो पापाचे कारण अध्यात्मिक उर्जा ज्यामुळें कमी होते ते असते. माणसाच्या अहंकारामुळे तो अनेक अशा गोष्टी करत असतो ज्यामुळे त्याला पाप लागते म्हणजे त्याची अध्यात्मिक उर्जा कमी होते. यमाच्या संहितेत त्याबद्दल नियम आहेत त्याप्रमाणे त्या माणसाला त्याच्या नंतरच्या जीवनात कांहीं असे वाईट भोग भोगावे लागतात जे त्याच्या कुकर्माचे फळ असते. ते सगळे ठरलेल्या नियमानुसार होत असते. त्यात कोणी बदल करू शकत नाही. राजाचे त्या पेक्षा वेगळे असते. राजाचे कायदे त्याच्या हित संरक्षणार्थ असतात. त्याचे पालन केले नाही तर गुन्हा ठरतो. त्याबद्दल राजाची न्याय व्यवस्था त्या गुन्हेगाराला शिक्षा देत असते व ती त्याच जन्मात भोगावी लागते.
धर्मारण्य विचारतो, "राजाने केलेली शिक्षा आणि यमाचे पापा कारणाने दिलेले दुर्दैव भोग ह्यांची कशी सांगड होत असते"?

राजा सांगतो, गेल्या जन्मी केलेल्या पापामुळे जी शिक्षा म्हणून जे दुर्दैव भोग ठरलेले असतात त्या प्रमाणे त्याला ह्याजन्मी राजाकडून कांहीं शिक्षा होत असते. अशाप्रकारे त्यांची सांगड होत असते. ह्या जन्मातील सगळे चांगले वाईट भोग आपल्या गतजन्माच्या कर्माची फळं असतात.

धर्मारण्य विचारतो, "पाप भोग देवतेच्या प्रसन्न होण्याने नष्ट होतात असें कांहीं सांगतात त्याबद्दल आपले काय सांगणे आहे"?

राजा सांगतो, पाप अथवा पुण्य भोग कधी नष्ट होत नाहीत. ते माणसाला भोगावेच लागतात. देवतेच्या अथवा कोण्या ऋषीच्या कृपेने ते भोग पुढच्या जन्मी वर्ग करता येतात त्यामुळे असा समज होतो कीं, ते नष्ट झाले. ब्रह्माची जरी कृपा झाली तरी ते भोग जे तुमच्या कृत्याचा विपाक आहेत ते नष्ट होत नाहीत ते तुम्हाला भोगावेच लागतात कारण तो तुमचा अध्यात्मिक हक्क असतो जो तुमच्या कर्माने निश्चित केला आहे.

धर्मारण्य विचारतो, "आपल्याच सुकर्माने आपलेच कुकर्म बाद करता येते कां"?

राजा सांगतो, "कर्म विपाकाचे जे सिद्धांत यमाने दिले आहेत त्याप्रमाणे चांगल्या कर्माची चांगली आणि वाईट कर्माची वाईट फळं माणसाला भोगावीच लागतात हे निश्चित. ते कोणत्या जन्मात ते सांगता येणार नाही. म्हणून सुकर्माने कुकर्माचे परिणाम बाद होत नाहीत. तो दोनही भोगावे लागतात.

धर्मारण्य विचारतो, पाप भोग कसे असतात"?

राजा सांगतो, अपमान, अपकिर्ती, शारिरीक वेदना, व्याधी, आर्थिक नुकसान, अपयश, अपंगत्व, कुरूपता, दुर्बुद्धी, मोह, विरह (प्रियजनांचा), गैरसमज, अन्याय, मनस्ताप, मनाची बेचैनी, विश्वासघात, चोर्या होणे, समाजाकडून दुर्लक्ष होणे, अपघात, शरीराचे भाग तुटणे, असाध्य व्याधी, बुद्धी विपरीत होणे, पाप करण्याची इच्छा होणे, संतान विरुद्ध जाणे, रहात्या घरातून बाहेर फेकले जाणे, निर्वंश होणे, पुत्रवियोग, पत्नी-पती सोडून जाणे, उपासमार, अत्याचर होणे, खून होणे, मृत्यू अशा विविध प्रकाराने तो दुर्दैव भोग माणसाला त्याच्या पापामुळे भोगावे लागतात. पापाच्या तीव्रतेनुसार त्या भोगांची तीव्रता ठरत असते. पुण्य भोगांचे नेमके

त्याच्या विरुद्ध असते. म्हणजे अपंगत्वा ऐवजी सधृढता, अपमाना ऐवजी सन्मान अशा प्रकारे होते. अपघात होण्या ऐवजी अपघात टळणे असे असते.

धर्मारण्य विचारतो, "अहो नृप मला सांगा, निवृत्तीला गेलेल्या माणसाला त्याच्या गत जन्माचे पापभोग भोगावे लागतात कां"?

राजा सांगतो, "निवृत्ती अथवा प्रवृत्तीच्या उच्च अवस्थेत गेलेल्या माणसाला सुद्धा त्याच्या आधीच्या सगळ्या चांगल्या आणि वाईट कर्माची फळं भोगावी लागतात. ते सगळे भोग पूर्ण झाल्यानंतरच तो निवृत्ती किंवा प्रवृत्तीच्या अवस्थेत जातो. प्रवृत्तीत असलेला त्याचे पुण्यभोग स्वर्गात अनुभवत असतो. परंतु त्याचे पापभोग ते पृथ्वीवरच भोगत असतो. त्या सगळ्या भोगांचे हिशोब पूर्ण होण्यासाठी कित्येक जन्म घ्यावे लागतात".

धर्मारण्य विचारतो, "क्षमा असते कां पाप भोगांना"?

राजा सांगतो, "क्षमा कधीच नसते ती एक कल्पना आहे. मतलबी ब्राह्मणांनी ते खूळ पुढे करून त्यांचा व्यवसाय वाढवला आहे. साधारण मनुष्य त्याच्या लोभात अडकलेला असल्याने पुरोहित जे सांगेल त्यावर तो विश्वास ठेवून स्वताची फसवणूक करून घेत असतो. अरे ब्राह्मणा, ही फसवणूक कृतयुगापासून चालू आहे. जोवर मनुष्य लोभात अडकलेला रहात आहे तोवर ही फसवणूक होतच रहाणार आहे. ब्रह्मदेवसुद्धा क्षमा करू शकत नाही".

धर्मारण्य विचारतो, "अशी फसवणूक करणार्याला त्या पापाबद्दल काय शिक्षा असते"?

राजा सांगतो, "जशास तसे ह्या न्यायाने त्या ब्राह्मणांची त्याच्या पुढच्या जन्मात फसवणूक होऊन ते त्या पापकर्माचे फळं भोगत असतात".

धर्मारण्य विचारतो, "जशास तसे हा नियम सगळ्याच पाप कर्मांना लागतो कां"?

राजा सांगतो, "बहुधा तोंच असतो परंतु, कांहीं पापं इतकी साधी नसतात. कांहीं पापांत इतर षड्रिपूंचा समावेष असतो जसे द्वेष, गर्व, मोह, मत्सर, क्रोध वगैरे त्या प्रमाणे पापांचा हिशोब जास्त गुंतागुंतीचा होत असतो.

धर्मारण्य, "एका माणसाचे भोग दुसर्या माणसाला अर्पण करता येतात कां"?

राजा सांगतो, "ज्याचे भोग त्यालाच भोगावे लागतात. त्या सगळ्या कल्पना पुरोहित वर्गाने त्याचे यज्ञादि उद्योग चांगले चालावेत म्हणून प्रचारात आणल्या आहेत"

धर्मारण्या विचारतो, "समजा एकादा सदाचारी पुण्य मिळवण्यासाठी एकाद्या दुर्दैव भोगीला मदत करतो व त्याला दुर्दैव भोगातून मुक्त करतो. असे केल्याने त्या सदाचारीने यमाच्या कामात ढवळाढवळ केली म्हणून त्याला कोणती शिक्षा होत असते"?

पद्मनाभ राजा सांगतो, "सदाचारीने चांगुलपणा केला त्यामुळे त्याला त्याबद्दल पुण्य प्राप्त होते. त्याची अध्यात्मिक उर्जा वाढून तो अधिक श्रेष्ठ होत असतो. कोणतीही शिक्षा होत नाही. त्याच प्रमाणे दुर्दैव भोगी जरी त्या जन्मात ते दुर्दैव भोग भोगत नसला तरी ते सगळे उरलेले भोग त्याला त्याच्या पुढच्या जन्मी भोगावेच लागतात. अशारितीने तो हिशोब पूर्ण होतो".

धर्मारण्य विचारतो, "एकादा दुराचारी एकाद्या सुखात असलेल्याला छळून पिडा देतो व त्याच्या जीवनात दुःख आणतो अशा वेळी यमाचा हिशोब काय असेल"?

राजा सांगतो, "सुखात असलेल्याला छळण्याची इच्छा त्या दुराचारीला होते कारण त्या सुखात असलेल्याच्या दैवात तो छळ होता. त्याचप्रमाणे तो दुराचारी त्याच्या त्या दुष्कर्मामुळे पापी झाला आहे ते पाप तो त्याच्या पुढच्या जन्मी भोगेल, त्याचा कोणी छळ करून ते साध्य होते असा यमाचा हिशोब असेल.

धर्मारण्य विचारतो, "अहो राजा मला सांगा पुण्याचे दान करता येते कां, माणसाला"?

पद्मनाभ बोलतो, "पुण्य व पाप हे अध्यात्मिक उर्जेशी संबंधित असे भोग प्रकार आहेत. ते कोणी कोणाला दान करू शकत नाही. ते मी तुला आधीच सांगितले आहे त्याप्रमाणे मनुष्य त्याचे पुण्य व पाप हे भोगाचे प्रकार कोणाला दान करू शकत नाही. परंतु, कांहीं विशिष्ट आगम शास्त्रात दिलेल्या विधींद्वारा तो त्याची अध्यात्मिक शक्ती दान करू शकतो अथवा दुसर्याची काढून घेऊ शकतो. तो कर्मकांडातील एक मोठा रहस्यमय विषय आहे. त्या विधींच्या मदतीने अनेक असुर, राक्षस इतरांची अध्यात्मिक उर्जा काढून घेऊन स्वतः शक्तिमान होत असतात. म्हणून कधीही कोणाला आपले घामाने भिजलेले वस्त्र, केस, नखं, पायताण, डोक्याचे मुंडासे अशा निजी वस्तु ज्यांचा नित्य उपयोग होत असतो व ज्याच्याशी त्याची अस्मिता कळत नकळत जोडली गेली आहे त्या गोष्टी

द्यावयाच्या नसतात. ती विद्या आत्मसात करूनच असुर, राक्षस, दैत्य आणि दानव शिरजोर झाले आहेत. ते नेहमी कोण्या पुण्यवान माणसाच्या मागे असतात व जेव्हां संधी मिळेल तेव्हां त्या निजी गोष्टी त्याच्या संमतिने काढून घेतात आणि त्यांवर मंत्र प्रयोग करून त्याद्वारा त्या माणसाची अध्यात्मिक उर्जा हस्तगत करतात. फार पूर्वीपासून असे होत आले आहे. त्याकारणाने अनेक पुण्यवान बरबाद झाले आहेत. कृतयुगापासून दैत्य आणि दानव ह्यासाठी ख्यातनाम आहेत. किंबहूना त्या योगामुळें ते दैत्य, दानव, राक्षस असें बनले असुरांतून. त्यासाठी कधी कोणाला स्पर्श करू नये किंवा कोणाला तुम्हाला स्पर्श करू देऊ नका कारण केवळ स्पर्शानेसुद्धा तुमची अध्यात्मिक उर्जा निघून जाऊ शकते. म्हणून योग्याने अस्पर्श राहिले पाहिजे.

धर्मारण्य विचारतो, "मला सांगा, देवतांची अध्यात्मिक उर्जा तशा मंत्रांनी काढून घेता येते कां"?

राजा सांगतो, "अरे ब्राह्मणा, केवळ ते मंत्र उच्चारू कांहीं होत नसते. ते मंत्र उच्चारण्याची परवानगी असावी लागते. ती मिळण्यासाठी तो मांत्रिक तितका उच्च दर्जाचा असावा लागतो. ज्याची अध्यात्मिक उर्जा काढावयाची त्याच्या पेक्षा तो मांत्रिक जास्त सामर्थ्यवान असावा लागतो. जर मांत्रिक कमी पुण्यवान असेल तर ते मंत्र उलटतात आणि त्याची अध्यात्मिक उर्जा उलट ज्याची काढण्यासाठी विधी केला त्याला मिळत असते. म्हणून असे विधी करण्या आधी त्या मांत्रिकाला त्याची आणि ज्याचे काढावयाचे त्याची ह्याचे योग्य अंदाज प्रथम अजमावयाचे असतात. देवतांची अध्यात्मिक उर्जा प्रचंड असते त्यांची उर्जा खेचण्यासाठी तितकी प्रचंड उर्जा मांत्रिकाकडे असावी लागते. बहुधा ते शक्य नसते. परंतु, असे अनेक राक्षस होऊन गेले त्यांनी साक्षात अंबामातेची उर्जा काढण्याचा प्रयत्न केला त्याच्या कथा प्राचीन पुराणात आहेत. ते करतांना त्यांना देवीशी लढावे लागले अशी युद्ध (अध्यात्मिक उर्जेच्या खेचा खेचीची) हजारो वर्षे होत होती व त्यात ते अखेरीस देवीने मारल्याच्या कथा आपण पुराणात पहातो. म्हणून चंडीका, महिषासूरमर्दीनी अशा विविध नांवांने अंबा माता ओळखली जाते. अरे ब्राह्मणा, अनेक कमी प्रतिच्या देवांचा नाश कांहीं बलदंड राक्षसांनी त्यांची अध्यात्मिक उर्जा काढून घेऊन केला आहे. अशाप्रकारच्या अध्यात्मिक चोर्या करणारे

असुर, राक्षस, दैत्य आणि दानव अशा संज्ञाने ओळखले जातात. दानव देव युद्ध ज्यांचा उल्लेख पुराणांत होतो ती दगडगोट्यांची किंवा धनुष्य बाणांची नव्हती. ती अध्यात्मिक उर्जेच्या खेचाखेचीची होती. त्यात मायेचा आधार नेहमी दानवांना मिळत असे कारण दानव, राक्षस वगैरे अहंकाराने प्रेरित होते. माया आदिपुरूषाच्या अहंकाराचा परिणाम असतो. त्यामुळे तू पाहिले असशील कीं, सगळ्या युद्धात ते दानव, असुर, राक्षस, दैत्य नेहमी सरशी करत असतात व शेवटी विष्णूला नाहीतर ब्रह्माला नाहीतर महादेवाला देवांची मदत करावी लागत असते त्यानंतर ते त्यांची अध्यात्मिक उर्जा वाचवू शकतात. असे चित्र तुला प्रत्येक देव दानव युद्धात दिसेल. जर तशी मदत मिळाली नाही तर देव त्यांची अध्यात्मिक शक्ती घालवून बरबाद झाले असते. पुराणात हे सगळे तू वाचले असशील तसेंच वेदांत सुद्धा त्यांच्या समराचे उल्लेख तू पहाशिल.

धर्मारण्य विचारतो, "अहो ज्ञानी पद्मनाभ, मला समजून घेण्याची इच्छा आहे कीं, ते राक्षस अशी कोणती साधना करतात ज्यामुळे ते उच्च कोटीचे अध्यात्मिक होतात, इतके कीं ते देवांची अध्यात्मिक उर्जा खेचू शकतात. मला त्या साधना पद्धतीबद्दल सांगा".

राजा सांगतो, "अध्यात्मिक उर्जा हींच खरी संपत्ती आहे. वास्तविक धन दौलत हे क्षणभूंगूर असतात. त्याचा स्वामी कुबेर अथवा वैश्रावण किंवा गणेश आहे. त्यांचे महात्म्य पृथ्वीवर असते परंतु, अध्यात्मिक उर्जेचे महात्म्य सर्वकडे असते. तिची देवता आहे लक्ष्मी जे विष्णूचे अर्धांग आहे. तिच्या प्राप्ती करता अनेक पद्धति ऋषी, देव आणि असुर वापरत असतात. त्या सगळ्यांची थोडक्यात मी तुला माहीती देतो. मी स्थुल पद्धती पासून सुक्ष्म पद्धती तुला सांगणार आहे.

स्थुल पद्धती तुलनेने सोप्या परंतु कमी प्रभावी असतात. त्या साधारण मनुष्य चांगुलपणा, माणूसकी, भूतदया आणि प्रामाणिकपणा, ह्यांचे पालन मर्यादेने करतो त्याने तो सामान्य मनुष्य अध्यात्मिक उर्जा जमवत असतो. ही सामान्य पद्धत आहे अध्यात्मिक उर्जा जमवण्याची व त्याचा परिणाम म्हणून तो पुण्यवान होत असतो. ह्या स्थुल पद्धतीने फार सावकाश अध्यात्मिक उर्जा मिळत असते. तेवढ्याने देवतांना प्रसन्न

करणे शक्य नसते. त्यासाठी जास्त वेगवान पद्धती योगी वापरतात. त्यासाठी आगम शस्त्राचा विकास झाला आहे. त्याचे मुलतत्त्व असें आहे कीं, देवतांना प्रसन्न करून त्यांच्या कडून अध्यात्मिक उर्जेचे कर्ज काढणे. नाहीतर जपयज्ञ करणे. असें दोन मार्ग प्रचारात आहेत. देवतांकडून अध्यात्मिक उर्जेचे कर्ज काढले तर ते परत फेडावे लागते. ते फेडण्यासाठी जपयज्ञ करावा लागतो. जपयज्ञ हा अध्यात्मिक उर्जा कमावण्याचा सर्वश्रेष्ठ मार्ग असतो.

ज्यांचा उपयोग कर्मकांडात होत असतो ती पद्धत सांगतो. अध्यात्मिक उर्जा आत्म्याची असते म्हणून ती साधना शरीराच्या म्हणजे जीवाच्या मदतीने करता येत नाही. त्यासाठी आत्म्याचे संयमन करावयाचे असते. केवळ शरीराच्या इंद्रियांच्या संयमनाने ते साध्य होत नाही. तरी अरे ब्राह्मणा, सुरूवात शरीराच्या वासनांच्या संयमानेच करावी लागते. शरीराच्या नित्य गरजा (हगणे, मुतणे, खाणे, पिणे, झोपणे, मनोरंजन करणे इत्यादि) आणि प्रासंगिक गरजा (अभ्यास करणे, उद्योग करणे, इतर कार्य करणे) ह्यांच्या नियमनाने ते सुरू होते. मिताहार, मितबोल, विचारशून्य रहाणे अशा प्रकारे ते सुरू करता येते. यथाक्रम त्याची व्याप्ती वाढवावयाची असते. शरीराच्या गरजा किमान पातळीवर आल्यानंतर आत्म्याच्या वासनांचा त्या योग्याला मुकाबला करावा लागतो. हे सगळे होण्यास बराच अवधी (अनेक वर्षे) लागत असतो. शरीर हट्टी असते ते ऐकावयाला तयार नसते. त्यासाठी कांहीं त्याला शिक्षा म्हणून एका पायावर उभे राहून ध्यान करणे, दोन हात वर करून उभ्या उभ्या ध्यान करणे असे अनेक प्रकार योगी अजमावतात. परंतु, ज्याचे त्याच्या शरीरावर पुरेसे नियंत्रण आहे त्याला अशाप्रकारे शरीराला त्रास न देतासुद्धा ध्यान करणे जमते. ध्यान करणे म्हणजे विचारशून्य अवस्थेत मन आणि बुद्धी नेणे. हे सगळे सहज होण्यासाठी बराच अवधी लागतो. जेव्हां ध्यान चांगले लागते म्हणजे विचारशून्य अवस्थेत तो योगी सहजपणे जातो. त्या बरोबर त्या योग्याला चांगुलपणा, माणूसकी, भूतदया, प्रामाणिकपणा ह्यांचे मर्यादा सांभाळून आचरण करावयाचे असते. त्याशिवाय त्या साधकाला परमेश्वरावर श्रद्धा असली पाहिजे. कारण अशा साधना महादेव, विष्णू, अंबा माता अशा उच्च श्रेणीच्या देवतांच्या परवानगी शिवाय करणे शक्य नसते. अरे ब्राह्मणा, तू गृहस्थाश्रमी असशिल तर ती

साधना करणे तुला अवघड जाईल कारण त्या आश्रमाच्या गरजा अशा साधनेच्या विपर्यस्त असतात. तू तिसर्या आश्रमात (वानप्रस्थाश्रम) असशिल तर ते सहज शक्य होईल. जर सगळी साधना योग्य दिशेने होत असेल तर अध्यात्मिक उर्जा नियंत्रण करणार्या कांहीं देवता असतात त्या प्रसन्न होतात. त्याची वेगळी साधना त्यानंतर तो योगी करतो त्यासाठी त्या देवता योग्याला शिकवतात ते कसे करावयाचे व त्या देवता त्याला इतरांची अध्यात्मिक शक्ती खेचण्याचे शिकवतात. त्या देवतांना प्रसन्न ठेवावे लागते. त्या देवता ब्रह्मदेवाच्या अधिकारात असतात. ही साधारण साधना मी तुला सांगितली ज्यात बराच अवधी खर्च होत असतो".

"आता दुसरा प्रकार सांगतो. प्राचीन काळी असुर, राक्षस इत्यादि ब्रह्मदेव महादेव ह्यांचे उपावतार जसे प्रजापति आणि रुद्र, महारुद्र ह्यांची आराधना करून त्यांना त्यानी कमावलेले अध्यात्मिक बळ दान करून त्याच्या बदल्यात वर मिळवत असतं. ते शक्य होते कारण ब्रह्मदेव आणि रुद्र हे अहंकाराचे संरक्षण करणारे आहेत, प्रकृतीला तिचे कार्य करण्यास मदत करण्यासाठी बांधलेले असतात म्हणून अहंकाराने प्रेरित जे आहेत ते सगळे त्यांची मदत घेऊन काम करत असतात. व्यक्त सृष्टी अहंकाराने कार्यरत असते. अहंकार नसला तर ते अव्यक्त असते. म्हणून पुरूष जो अहंकार विरहीत आहे तो अव्यक्त असतो. त्या उलट प्रजापति आणि रुद्र मानवी अवतार घेऊन त्यांची कामं करत असतात. अहंकार विरहीत पुरूष कधी मानवी अथवा इतर कोणत्याही व्यक्त रुपात प्रकट होत नाही".

धर्मारण्य विचारतो, "आपण सांगता कीं, जपयज्ञ हा उत्तम मार्ग आहे तरी त्याबद्दल मला सांगा".

राजा नागा पद्मनाभ सांगतो, कांहीं मूलमंत्र आहेत त्यांचा जप एकाग्र चित्ताने करण्याच्या पद्धतीला जपयज्ञ म्हणतात. त्यात आपले शरीर हेंच होम कुंड समजले जाते . त्यातील अग्नी हांच यज्ञाचा अग्नी असतो. त्या अग्नीला यज्ञ करणारा त्याच्या वासना अर्पण करतो व त्या वासनांचा होम करतो. जशा त्या वासना कमी कमी होत जातात त्या यज्ञाची ताकद वाढत जाते. मनाने जर एकचित्ताने जप करत राहीले तर त्या मनात इतर कोणताही विचार येऊ शकत नाही ह्या मनाच्या गुणाचा ह्या ठिकाणी उपयोग केला जातो.

अशारितीने विचारशून्य अवस्थेत तो जप केला जातो त्या मार्गाने वेगांने आत्म्याची अध्यात्मिक उर्जा वाढवता येते. तरी अरे ब्राह्मणा, त्याला सुद्धा बर्याच वर्षाची साधना करावी लागते. अध्यात्मिक उर्जा विशिष्ट पातळीपेक्षा जास्त झाली तर विविध देवता योग्याला दर्शन देऊ लागतात. त्यांच्या कडून त्याला बरोबर अथवा चुकीचे मार्गदर्शन मिळू लागते. त्यात गेल्या जन्माची पुण्याई उपयोगी येत असते. जर योगी सावध असेल तर तो चुकीचे मार्गदर्शन स्वीकारत नाही आणि पुढे प्रगति करत असतो. जर तो फसला तर त्याची तपस्या वाया गेली असे समजावे कारण त्यांने जी अध्यात्मिक उर्जा कमावली, ती देवता चोरून नेते व तो पुन्हा पूर्ववत अवस्थेत येतो. अशी साधना फार शक्तीमान असली तरी मोठी जोखमीची असते. सगळी मेहनत व्यर्थ गेली असे होते. त्यासाठी अरे ब्राह्मणा, गुरूच्या मदतीने ती साधना करावी असे प्राचीन ऋषी सांगतात. ज्याला चांगला सद्‌गुरू लाभला तो जपयज्ञात सिद्ध होतो व त्याला विविध सिद्धी प्राप्त होतात. तू माझ्या मते च्यवन ऋषीच्या मार्गदर्शनात जा. ते तुला चांगले तयार करतील. ते करत असतांना सुद्धा त्याला चांगुलपाणाचा धर्म आचरणे बंधन कारक असते.

धर्मारण्य पुढे विचारतो, "जपयज्ञ करण्यासाठी कोणता जप निवडावा व तोंच का निवडावा त्याबद्दल सांगा".

राजा सांगतो, "साधारणपणे माणूस त्याच्या आराध्य देवतेचा सिद्ध मंत्र निवडेल तर बरे, अशी प्राचीन प्रथा आहे. तू ब्राह्मण आहेस म्हणून तुला तुझ्या आराध्य देवतेचा मंत्र ज्ञात असेल तर तो तू करत जा. परंतु, जर कोण्या शुद्राला जपयज्ञ करावयाचा असेल व त्याला आराध्य दैवत नसेल किंवा कोणी दस्यू जपयज्ञ करू इच्छित असेल तर त्यांने महादेवाचा, महादेवीचा, नारायणाचा नाहीतर गणेशाचा (प्रथमेश) जप करावा".

धर्मारण्य विचारतो, "जपयज्ञासाठी जो ज्याचा त्याने करावयाचा असतो कांहीं दिक्षा घ्यावयाची असते कां"? तसेंच केव्हां व कसा तो जपयज्ञ प्रारंभ करावा ते सांगा".

राजा सांगतो, जपयज्ञ करण्यासाठी कोणतीही दिक्षा, विधी, मुहूर्त असं कांहीं लागत नाही. तो मंत्र मनात जपावयाचा असतो आणि तो इतर कोणाला ऐकू जाणार नाही. ते त्या साधकाच्या खाजगी जीवनाचा भाग असेल. त्याचे जीवन पवित्र असेल. तो ब्रह्मचारी असेल, तो मिताहारी, कमी बोलणारा, लोकांत न मिसळणारा, एकांतात रहाणारा, शांत

चित्त, वैराग्य पूर्ण असा असेल. तो त्याच्या जागेपणी जप करत असेल जे कोणाला समजणार नाही. कारण तो व्यवहार त्याची आराध्य देवता व तो ह्यांचा खाजगी व्यवहार असतो. जपयज्ञाबद्दल तो कोणाशी चर्चा करणार नाही कीं त्याचे कोणी चेष्टा मस्करी करील. त्या महत्वपूर्ण तपस्येचे गांभिर्य तो राखेल".

धर्मारण्य विचारतो, "दिवसातून किती जप झाला पाहिजे असे कांहीं नियम आहेत कां"?

राजा सांगतो, "जप सतत करावा लागतो. निदान दहा हजार जप प्रति दिवस किमान असावा अशी अपेक्षा असते आणि जर योग्य अध्यात्मिक शिस्त पाळणारा असेल तर तीन वर्षानंतर त्याचे परिणाम दिसू लागतात". म्हणजे एक कोटी जप किमान करावा लागतो त्यानंतर त्याचे परिणाम प्रति वर्ष वाढत जातात. साधकाच्या पुण्या प्रमाणे ते परिणाम असतात. जप करण्याची सवय लागली कीं जप आपोआप होत रहातो त्यासाठी साधकाची त्याबद्दलची इच्छी किती तीव्र आहे ते महत्वाचे असते.

धर्मारण्य विचारतो, "जपयज्ञ मला माझ्यासाठी योग्य वाटतो त्यासाठी आणखीन काय करावयाचे ते सांगा, जसे त्यांने आहार काय कारावा, किती निद्रा घ्यावी, इतर कोणते धर्मकार्य करावे त्याबद्दल सांगा".

राजा सांगतो, "असा साधक त्याचा नेहमीचा आहार करत असेल ज्यात मांसाहार, शाकाहार, फलाहार, कंदमुळं, खाद्य पानं आणि इतर त्याच्या नेहमीच्या आहारात असतील ते त्यांने खावे. जमल्यास अधून मधून अनशन करावे. तो कोणतेही व्यसन करणार नाही.

*दैहिक व्यसनांत, दारु, वीडी सिगरेट, गांजा, अफु, तंबाखू, सुपारी, जुगार खेळणे, वेश्यागमन अथवा संभोगाचे व्यसन इत्यादि येतात. अशा व्यसनांमुळे ते पुरुष अशुद्ध ठरतात. स्त्रीस ही दैहिक व्यसने बहुधा नसतात. ह्यांबाबत त्या बहुधा शुद्ध असतात. मानसिक व्यसनांत मात्र पुरुषांपेक्षा स्त्री जास्त अडकलेली असल्याचे आढळून येते.*

*मानसिक व्यसने अशी, सतत काळजी करीत रहाणे, दुःखी रहाणे, संशय घेत रहाणे, काल्पनिक चिंतेत रमणे, रडणे, भांडखोरपणा, मत्सर करणे, जर स्त्री ह्या मानसिक व्यसनातून मुक्त झालेली नसेल तर त्या स्त्रीचे मृत्यूनंतरचे जीवन नरकासमान असेल.*

*पुरुषाला ही मानसिक व्यसनेसुद्धा सतावत असतात. वस्तुतः जीवनाच्या सुरुवातीपासूनच*

*माणसांने कोणत्याही व्यसनांत स्वताला गुंतवून ठेवू नये. हे साध्य होण्यासाठी वयाच्या चाळीशीपासूनच स्वताची व्यसनमुक्ति करण्यास सुरुवात करावी. ज्यांना असें कोणतेही व्यसन नाही असें लोक मृत्यूनंतर शांत व आरामशीर राहू शकतात.*

*त्यांचे मृत्यूनंतरचे जीवन सुखकर रहाते. भावनाविवश होणारी माणसे व्यसनात सांपडतात.*

*छंद व व्यसन ह्यातील फरक समजून घ्यावा लागेल. छंद माणसाला त्याचा काळ मजेत घालवण्यास मदत करतात. त्यांचा नाद मात्र नसावा. छंदात अनेक चांगल्या गोष्टी येतात. वाचन, लिखाण करणे, विविध खेळ खेळणे, प्रवास करणे, कांहीं वस्तु जमवणे असें विविध छंद माणूस आपल्या जीवनात वाढवतो. तेसुद्धा जर नाद झाले तर तेसुद्धा मृत्यूनंतर त्रासदायक ठरू शकतात. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे, माणसांनी आपल्या सर्व सवयी मर्यादीत अवस्थेत ठेवाव्यात.*

त्याचे जपयज्ञाचे अनुभव तो कोणाला सांगणार नाही. अशारितीने समजून जर कोणी हा यज्ञ करत असेल तर त्याची अध्यात्मिक शक्ती फार वेगांने वाढत जाते. कांहीं वर्षात (बारा किमान) तो सिद्ध योगी होऊ शकतो. इतका हा जपयज्ञ प्रभावी असतो. बर्याचवेळा गेल्या जन्माची साधना त्याला मदत करत असते".

धर्मारण्य विचारतो, "जपयज्ञाची प्रमूख देवता कोण असते व तिचा आणि आराध्य देवतेचा कांहीं संबंध असतो कां"?

राजा सांगतो, जपयज्ञ जरी आराध्य देवतेसाठी असला तरी त्याला उत्तर मात्र परमात्मा विष्णू रुपाने देत असतो. त्याचे कारण सगळे जप शेवटी परमेश्वराला पोहोचत असतात. आराध्य देवता फक्त एक माध्यम असते. जपयज्ञ जसा फलश्रूतीच्या दिशेने त्याची वाटचाल करत असतो तो परब्रह्माला पोहोचतो म्हणजे ते असे आहे ब्राह्मणा, जप करणे म्हणजे तो याचक देवाला हांक मारत आहे. अशी याचकाची भूमिका असावी लागते. अखेरीस तो परमात्मा जो सगळ्या जीवांच्या भल्यासाठी बांधला आहे तो ती हांक ऐकतो. असा जपी त्याचा यज्ञ पूर्ण होत आला आहे तो निवृत्तीकडे जात असतो. इतका साधा

सरळ व सोपा अध्यात्म मार्ग दुसरा नाही. जितकी आत्मियता तीव्र तितकी लवकर फलश्रुती त्या यज्ञाला मिळत असते".

धर्मारण्य विचारतो, "जपयज्ञ अधिक प्रभावी कसा करता येतो ते सांगा".

राजा सांगतो, "जपयज्ञ आणि त्यावर ध्यान करणे असें जर तुला करता आले तर त्याचे परिणाम मोठे तीव्र असतात. ध्यानात जप करणे असा त्याचा अर्थ होतो. त्यासाठी जपयज्ञ करणारा समाजातून वेगळा राहू लागतो. तो कोणाशी बोलत नाही. त्याचे सगळे ध्यान त्याच्यातील अंतरात्म्यावर असेल. तो पूर्ण संन्यासी झालेला असतो. क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर अशा विकृत्या त्यात असून चालणार नाही. अशा एकात्मकतेने जो तो यज्ञ करतो तो फार लवकर निवृत्तीला पोहोचतो. सर्व इच्छांबद्दल तो उदास असला पाहिजे. त्याच जन्मात तो जन्मजन्मांतरीच्या फेर्यातून मुक्त होतो. एरवी त्याला अनेक जन्म घ्यावे लागतात.

धर्मारण्य विचारतो, "अहो राजे, तुम्ही मघा बोललात कीं शरीराच्या होमकुंडात वासनां अर्पण कराव्यात. ते कसे करावयाचे ते सांगा. त्यासाठी मनाची कोणती भूमिका आवश्यक असते ते सांगा. कारण मला ते समजलेले नाही".

राजा सांगतो, "वासनांबद्दल औदासिन्याची भूमिका मनात बाळगणे म्हणजे वासना होमात अर्पण करणे असे होते. औदासिन्य बाळगता येणे हे तुला जमले तर तुझ्या गृहस्थाश्रमाच्या मोहाचा नाश होईल. त्या मनोरचनेसाठी तुला तशी प्रामाणिक इच्छा असावी लागते. त्यात जरा तरी खोटेपणा असेल तर तू जपयज्ञात कामयाब होणार नाहीस.

धर्मारण्य विचारतो, "अहो राजे, मला माझ्या कुटूंबाचा मोह आवरता येत नाही तरी रिवाजाप्रमाणे मला वानप्रस्थाश्रमी जावे लागणार आहे तरी त्या करता कांहीं मार्गदर्शन कराल तर बरे होईल".

राजा स्मित करत बोलतो, तुझा प्रश्न आम आहे. सगळ्यांनाच त्या पेचांतून जावे लागते त्यासाठी फार प्राचीन काळी जनक राजाने तो प्रश्न याज्ञवलक्यांना विचारला होता त्याला जे ते सांगतात ते मी तुला सांगतो".

गृहस्थाश्रमी एकदम त्याचे निवासस्थान सोडत नाही. तो कांहीं काळासाठी वनात जाऊन रहातो. महिना दोन महिने राहिल्यानंतर तो परत त्याच्या घरी येतो तेथे तो कांहीं काळ

(महिना दोन महिने) रहातो नंतर पुन्हा वनात जाते अशारितीने तो त्याचा वनातील वास्तव्याचा काळ वाढवत वाढवत पुढे कायम वनात रहातो. तेथे असलेल्या ऋषींच्या आश्रमात तो जपयज्ञ चांगला करू शकेल कारण तसा यज्ञ करणारे तेथे कित्येक असतील. अरे ब्राह्मणा, तू समजतोस तितका हा प्रश्न अवघड नाही".

ते दोघेही ब्राह्मण एकमेकांकडे पहात ते पटल्याचे दाखवतात. त्यांच्या सगळ्या प्रश्नाची उत्तरं नागा राजा पद्मनाभाने दिली होती तरी कांहीं प्रश्न दुसर्या ब्राह्मणाला (अतिथी) विचारावयाचे होते म्हणून तो राजाला पुन्हा त्याचे प्रश्न विचारण्याची संमती मागतो. राजा मोठ्या आनंदाने त्याला त्याचे प्रश्न विचारण्याची संमति देतो.

तो वृद्ध विद्वान ब्राह्मण राजाला बोलतो कीं, "अरे राजा तू फार ज्ञानी आहेस. सूर्याचा रथ खेचण्याचे काम तुला करावे लागते ह्या वरून तू किती थोर आहेस हे मी समजलो. प्रथम मी तुला विनम्र वंदन करतो असे बोलून तो द्विज दोनही हात जोडून नागा राजाला वंदन करतो त्यानंतर तो त्याचा प्रश्न विचारतो.

"अरे राजा तू न्याय देतांना कित्येक गुन्हेगारांना मोठ्या शिक्षा करत असणार, मला सांग यम त्यासाठी तुला कोणती शिक्षा करतो कां काय करतो. असें विचारण्याचे कारण न्याय देतांना अशा सजा राजा देतो कीं त्या पापकारक असतात जर कोणी सामान्य मनुष्य तसे वागेल. थोडक्यात विचारावयाचे असें कीं, राजाच्या त्या पापकारक शिक्षांबद्दल यमाचे काय धोरण असते ते मला समजून घ्यावयाचे आहे".

राजा सांगतो, तुमची शंका रास्त आहे. खरोखरच राजाला तशा अघोरी शिक्षा करण्याचे प्रसंग वारंवार येत असतात. परंतु, राजा जर सर्वमान्य आणि परमेश्वर संमत असेल तर त्याला वेगळ्या दृष्टीने यम पहात असतो. त्याला यम त्याचा एक भाग समजून वागत असतो. परंतु, जर राजा त्याच्या अधिकाराचा गैर उपयोग करत असेल जे प्रायः अनेक राजांच्याबाबत होत असते, तसे असेल तर मात्र त्या राजाला आणि त्याच्या प्रधानांना त्यांच्या कृत्याबद्दल त्यांच्या पुढच्या जन्मी अनेक दुःख भोग भोगावे लागतात. कांहीं नरकात फेकले जातात.

ब्राह्मण विचारतो, "राजाला सर्वमान्य आणि परमेश्वर संमत कसे होता येते ते समजावून सांगा".

राजा सांगतो, "राज्याची जनता पांच वर्णात विभागलेली असते. त्यातील पहिला वर्ण ब्राह्मण त्या वर्णाच्या लोकांची संमती राजाला असावी लागते. तिच्यासाठी राजाला पवित्र, बुद्धीमान, तपस्वी, पुण्यवान, व्रतस्थ असावे लागते कारण त्या गुणांनेच तो ब्राह्मणांची मान्यता मिळवू शकतो. परंतु त्यांची संख्या नेहमीच फार अल्प असते. त्यानंतर दुसरा वर्ण येतो क्षत्रिय, त्याची मान्याता मिळण्यासाठी राजा नितीमान, प्रामाणिक, शूर, क्षमाशिल, कर्तबगार असावा लागतो. त्या वर्णातील लोक लढवय्ये, बुद्धीमान, सूज्ञ, दूरदृष्टी असलेले आणि त्यांच्या सामाजिक जबाबदारीबद्दल सतर्क (जागरूक) असे असतात. त्यांची संख्या ब्राह्मणांपेक्षा जास्त असते. त्यानंतर आहेत वैश्य त्यांची संख्या मोठी असते व ते राज्याच्या धन व्यवस्थेचा मूळ आधार असतात. त्यांची मान्यता मिळण्यासाठी राजा व्यवहार चतूर, हिशोबी, प्रामाणिक, न्यायी, दिलदार असावा लागतो. शेवटी असतात शुद्र आणि दस्यू, त्यांची संख्या सर्वात जास्त असते त्यांची मान्यता मिळण्यासाठी राजात चांगुलपणा, माणूसकी, भूतदया, समजूतदार, न्यायी, प्रेमळ असें गुण असावे लागतात. अशा सगळ्या प्रजेची संमति राजाला असावी लागते. त्यानंतर म्हणजे ज्या राजात ते सगळे गुण आहेत त्याला प्रजेची मान्यता आहे असे समजता येते. एवढ्याने राज्याची सगळी प्रजा संपत नाही. त्याशिवाय राजात असलेली अव्यक्त प्रजा जी मोठ्या प्रमाणांने राजाच्या कारभारात दखल अंदाजी करत असतात ते आहेत गांवदेवता, पितर, पिशाच्च, कुळदेवता इत्यादी अनेक देवता व इतर प्रकारच्या शक्ती. त्यांची संमती मिळण्यासाठी राजाला अध्यात्मिक सामर्थ्य असावे लागते. राजा तपस्वी असला पाहिजे. त्याच्या कडे ऋषी, मुनी अशाप्रकारचे अध्यात्मिक दृष्ट्या सामर्थ्यवान लोकांचे येणे जाणे असे पाहिजे. तो ब्रह्मचर्य पालन करणारा असला पाहिजे. जर त्या दिव्य शक्तींची मान्यता राजाला नसेल तर राज्यात दुष्काळ, पूर, अवर्षण अथवा जास्त पाऊस, रोगांच्या साथी, परचक्राचे आक्रमण, राज्यातील राजकर्त्यांत भांडणं, शेतात रोग पडणे, कठोर उन्हाळा वा कडक थंडी, राज्यात बंडखोरी अशा अनेक संकटांना त्या राजाच्या प्रजेला तोंड द्यावे लागते. अरे ब्राह्मणा, जर अशाप्रकारे राजा सर्वगुणसंपन्न असेल तर तो यमाला मान्य असतो आणि त्या राजाचे न्याय हा यमाचा न्याय म्हणून स्वीकारला जातो. परंतु, राजा असा सर्वगुणसंपन्न नसेल तर तो यमाच्या मान्यतेत येत नाही, तो एक लुटारू असे यम समजतो व त्याला

त्याच्या प्रजेला दिलेल्या त्रासासाठी त्याच्या नंतरच्या जन्मात अथवा तो राजा भूतयोनीत असतांना दुर्दैव भोग भोगत रहातो. कधी असा राजा नरकात फेकला जातो. अरे ब्राह्मणा, तू कित्येक राजे, सम्राट, विशाल (सम्राटापेक्षा मोठा राजा) त्यांच्या मृत्यूनंतर रौरौ नरकात खितपत पडलेले आहेत ते पहाशिल, त्यांना गति नाही. अरे ब्राह्मणा, केवळ राजा तसा असून भागत नाही त्याशिवाय त्याचे प्रधान, मंत्री असे सगळे कारभारी त्याप्रमाणे इतके गुणी असावे लागतात. ज्या राज्याला असे गुणीजन राज्यकर्ते म्हणून लाभले ते राज्य भाग्यवान समजले जाते. तशा राज्यावर यमाची मोठी मेहेरनजर सदैव असते. ते राज्य कृतयुगात असल्यासारखे असते".

"अरे ब्राह्मणानो, कित्येत भ्रष्ट पुरोहीत विविध यज्ञाची खोटी आश्वासनं देऊन राजांना फसवत असतात कीं, राजा भ्रष्ट असला तरी तो यज्ञ केला तर त्याची वरणी यमाकडे लागेल, आणि ते मूर्ख राजे ते यज्ञ करत रहातात, शेवटी नष्ट होतात. अशा कित्येक कथा मी तुम्हाला सांगू शकेन कीं, भ्रष्ट पुरोहित कसे राजाला फसवत असतात".

धर्मारण्य ब्राह्मण विचारतो, "मग असे समजावयाचे कां ते यज्ञ करणे हे निरर्थक आहे"?

राजा सांगतो, "वेदातील बरेच यज्ञ निरर्थक असतात. कारण ब्रह्माची कृपा केवळ यज्ञयाग करून कधीच प्राप्त होत नसते. त्या करता ते यज्ञ करणार्या यजमानात आणि पुरोहितांत अध्यात्मिक सामर्थ्य असावे लागते. ते जर नसेल तर केवळ यज्ञ केला म्हणून कांहीं साध्य होण्यासारखे नसते. केवळ पोपटपंची केल्यासारखे ते असते. अगदी कृतयुगापासून अशी फसवणूक पुरोहित ब्राह्मण राजांची आणि प्रजेची करून त्यांना लुटत असतात.

ब्राह्मण विचारतो, अरे नागा राजा मला सांगा, प्रजेतील कांहीं लोक कां राजाचे केलेले नियम तोडतात? तसे होऊ नये ह्याकरतां राजा काय करू शकतो अथवा काय केले पाहिजे ते सांग".

राजा सांगतो, "दोन कारणासाठी लोक राजाचे नियम तोडतात. एक असे कीं, राजाचे नियम चुकीचे असतात. दुसरे कारण प्रजेतील कांहीं लोक तमोगुणामुळे बेशिस्त असतात. प्रजेला शिस्त लावण्यासाठी राजाला शिस्त असावी लागते. जर राजास शिस्त नसेल व तो प्रजेला वळण लावण्याचा प्रयत्न करत असेल तर प्रजा विरूद्ध जाऊन बंड करते. राजा

स्वतः शिस्तबद्ध असला पाहिजे. बेशिस्त राजा असेल तर परचक्र येते आणि राजा मारला जातो त्याची सत्ता संपते कारण त्याला प्रजेचे सहकर्य मिळत नाही.

ब्राह्मण विचारतो, "राजाच्या त्याच्या प्रजे बाबात कोण कोणत्या जबाबदार्या असतात"?

राजा सांगतो, "राजाने त्यांचे संरक्षण दुराचारी लोकापासून करावे, राज्यव्यवस्था चोख सांभाळावी, परचक्रापासून संरक्षण द्यावे, राज्याची अर्थव्यवस्था सुरक्षित राखावी, भ्रष्टाचार मुक्त कारभार असावा, संस्कृतीचे संरक्षण करावे, राज्याच्या संस्कृतीचा, भाषेचा प्रचार इतरत्र करावा, ह्यामार्गांने त्या राज्याची इभ्रत सगळ्या जगात श्रेष्ठ करावी. राज्याच्या सीमा व्यापार उदीमांसाठी वाढवाव्यात. न्याय व्यवस्था चोख राखावी, दुराचारींचे नियंत्रण आणि आवश्यक असेल तर निर्दालन करावे. चोरांपासून प्रजेला संरक्षण द्यावे. राज्यातील गुणीजनाना उत्तेजन द्यावे अशा अपेक्षा प्रजेच्या असतात".

ब्राह्मण विचारतो, "राजा ब्राह्मणांकडून, क्षत्रियांकडून, वैश्यांकडून आणि शुद्र, दस्युंकडून कोणत्या गोष्टींची अपेक्षा करत असतो. म्हणजे अरे राजा, मला सांग राजाच्या त्याच्या प्रजेकडून काय अपेक्षा असतात"?

राजाची अपेक्षा असते कीं, प्रजा त्यांची कर्तव्ये इमाने इतबारे पूर्ण करतील.

त्याप्रमाणे, ब्राह्मण त्याचे कार्य जसें वेदाचा अभ्यास करणे, यज्ञ करणे, ब्रह्मचर्य पाळणे, इतरांना योग्य मार्गदर्शन करणे, ध्यान साधना व योगाचा अभ्यास करणे, शिकवणे आणि शिकणे, दानं देणे आणि घेणे, भिक्षा मागणे इत्यादि करतील अशी राजाची अपेक्षा असते.

क्षत्रियांकडून राजा अपेक्षा करतो कीं, सदाचारी आणि निरपराध लोकांचे दुराचार्यांपासून संरक्षण करणे, युद्धात राजाला साथ देणे, राज कारभारात मदत करणे, शत्रूंवर नजर ठेवणे, वेदाचा अभ्यास करणे, गृहस्थाश्रम सांभाळणे, इतर वाजवी कामं करणे अशी अपेक्षा असते.

वैश्यांकडून राजा अपेक्षा करतो कीं, ते कृषी सांभाळतील, व्यापार उदीम सांभाळातील, वेदाचा अभ्यास करतील, राजासाठी परदेशांत दुतांचे काम करतील, राजकारभारात आर्थिक बाबीत मदत करतील. राज्यातील (बारा) कारखाने पहातील इत्यादी कामं पहातील.

शुद्रा कडून राजा अपेक्षा करतो कीं, तो सगळ्या द्विजांना त्यांच्या कामात मदत करत असेल व त्याचा त्याला मोबदला मिळेल. त्याशिवाय करमणूकीचे कामं, कलाकुसरीची कामं, हेरगिरी, जासुसी, कोष्टी, वेती, माग चालवणे, उद्योगात मजूरी करणे, शिपायी, हरकाम्या, कर गोळा करणे, कालवे सांभाळणे, इतर नोकरदारी अशी काम ते सांभाळून समाजाची सेवा करून त्यातून ते त्यांचा उदरनिर्वाह करतील.

दास्यूंकडून राजाच्या अपेक्षा असतात, ते शिकार करणे, पशुपालन, मांस, मांसळी, पक्षी खाण्यासाठी विकणे, शेतात काम करणे, विविध कारागिरी, कलाकुसरी, नाटक तमाशा अशी कामं करणे.

अतिथी ब्राह्मण राजाला विचारतो, "अहो महाराज, मला समजत नाही, कोणी अंध, मुका, बहिरा जपयज्ञ कसा करणार"? कां त्याना हा मार्ग नाही असें समजावे कां"?

राजा सांगतो, "जपयज्ञात अनेक प्रकार उपयोगात आणले जातात. त्यातील कांहींमध्ये बोलावयाचे किंवा ऐकावयाचे नसते. त्या प्रकारांचा उपयोग करता येतो. त्याची माहीती सांगतो. जपयज्ञांत जो जप करावयाचा त्यातील एक जप असतो आपल्या श्वासोंश्वासाचा. त्याला सोऽहम असें म्हणतात. त्यातील सोऽ म्हणजे श्वास घेणे आणि हम म्हणजे श्वास सोडणे. त्या साधनेला सोऽहम साधना, असे सांख्य म्हणतात. त्यामध्ये योग्याला त्याच्या श्वासोंश्वासावर त्याचे लक्ष केंद्रीत करावयाचे असते. त्यासाठी तो मुका, बहिरा, आधंळा असा अपंग असला तरी कांहीं अडचण येत नाही. त्यास भाषेचेसुद्धा बंधन नसते म्हणून कोणीही लायक साधक तो जपयज्ञ करू शकतो. तसेंच साधारण साधकालासुद्धा सोऽहम जप करतांना त्याचे डोळे बंद करावयाचे असतात. कानसुद्धा बंद करावयाचे असतात. त्याशिवाय इतर ज्ञानेंद्रिये सुद्धा बंद करावी लागतात. त्यामुळे तो एकाद्या आंधळ्या, मुक्या, बहिर्या सारखाच होतो जपयज्ञ करतांना. म्हणून जपयज्ञ साधना कोणीही करू शकतो हे तुझ्या लक्षात येईल", असें राजा पद्मनाभ त्यास समजावतो.

अतिथी ब्राह्मण पुढे विचारतो, "योगशास्त्राप्रमाणे सर्व देवता त्यांच्या नरनारी अशा स्वरुपात असतात. त्यातून अर्धनारिनटेश्वर असे महादेवाचे रुप प्रचारात आले आहे. मला सांगा महाराज, साधकांनी कोणत्या रुपाची साधना करणे जास्त चांगले होईल.

मी असे विचारतो कारण मला माझे आराध्य दैवत ठरवावयाचे आहे त्यात स्त्री रुप चांगले असेल कां पुरूष रुप ते मला सांगा".

राजा सांगतो, "प्रत्येक देवतेला दोन अंग असतात. एक अंग असते, नरवाचक व दुसरे असतें, स्त्रीवाचक. त्याचा उल्लेख नरनारी असा केला जातो. ही दोन रुपं दोन भिन्न वर्तणूकी व्यक्त करतात. नर स्वरूप पुरुषी स्वभाव दाखवतो व स्त्री स्वरूप स्त्रीचा स्वभाव दाखवतो. आपण म्हणतो पुरुषात स्त्री असते व बाईत पुरुष असतो तसेंच हे असते. तें असें, पुरुषी स्वभाव थोडा बेपर्वा, उद्धट, कमी दयाळू, अस्वस्थ, शंकाखोर, आगाऊ आणि आळशी असा असतो त्या प्रमाणे, देवतेचे नरस्वरुप काम करते. देवतेचे स्त्री स्वरुप स्त्रीचा स्वभाव व्यक्त करते. तो आहे, काळजीपूर्वक, सहनशिल, नीटनेटके, ममताळू, नम्र, प्रेमळ, शांत, सावध, मेहनतू. अशा भिन्न वागणूकीमुळे देवतेचे स्त्री स्वरुप भक्तासाठी जास्त भावत असते. जर साधकांनी नर स्वरुप भक्ती करण्यासाठी निवडले तर त्याला त्या पुरुषी स्वरुपाकडून सहकार्य मिळत नाही. ते भक्ताची सतत परीक्षा घेत रहाते. पण जर देवतेचे स्त्री स्वरुप भक्तीसाठी निवडले तर त्या देवतेकडून भक्तास चांगले सहकर्य मिळते. आपण पहातो किं, आई ही वडीलांपेक्षा जास्त जवळची मुलांना वाटते तसें हे असते. म्हणजे, शंकरापेक्षा अंबेची पुजा करणे नेहमीच जास्त श्रेयस्कर असते. विष्णूपेक्षा लक्ष्मी जास्त लवकर पावते असे हे असल्याने प्रापंचिक याचकांनी नेहमी देवतेच्या स्त्री रुपाचीच भक्ति करणे चांगले असते असें समजले जाते. देवतेचे नर रुप भक्ताची जरा जास्तच परीक्षा घेत असते तसें देवतेचे मायरुप करीत नाही. थोडक्यात असे सुचवावयाचे आहे कीं, प्रापंचिक (गृहस्थाश्रमी) याचकांनी सहसा नररुपाची भक्ती न करतां माय रुपाचीच भक्ती करावी. विशेषकरून जर ती भक्ती सकाम असेंल तर ते जास्त आवश्यक ठरते. मोक्षार्थींनी नररुपाची भक्ती करावी".

अतिथी ब्राह्मण विचारतो, "आपण सांगता, चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया हे पुण्य कमावण्याचे किंवा अध्यात्मिक शक्ती वाढवण्यासाठी आवश्यक आहेत त्यांचा अर्थ सांगाल तर बरे होईल".

राजा त्या संज्ञांचा अर्थ सांगतो, "पुढील जन्म सुख, सन्मान, किर्ती, समृद्धी, यश आणि सौंदर्यवान होण्यासाठी माणसाने ह्या जन्मात काय केले पाहिजे ते सांगतो".

"कोणाच्याही अज्ञानाचा, गरीबीचा, भोळेपणाचा, कमजोरीचा गैरफायदा न घेणे ह्यालाच **माणूसकी** असें म्हणतात. ह्याची मर्यादा आहे, सत्पात्र व अपात्र ह्याचा विचार करावा लागतो. ह्याच्या विरूद्ध जे वागणे त्याला अमानुषपणा असे म्हणतात.

मला समाजाने कसे वागवावे असें मला वाटते, तसेंच मी समाजातील लोकाशी वागणे ह्याला **चांगुलपणा** असें म्हणतात. ह्याची मर्यादा आहे, सत्पात्र व अपात्र ह्याचा विचार करावा लागतो. ह्याच्या विरुद्ध जे वागणे त्याला वाईटपणा असे म्हणतात.

सर्व प्राणिमात्रांबद्दल सन्मानाची भावना बाळगून त्या प्रमाणे जगणे आणि सर्व प्राणिमात्रांचा आदर करणे ह्याला **भूतदया** असें म्हणतात. ह्याची मर्यादा आहे, जे त्या विरुद्ध वागतात ते दुष्ट समजले जातात".

*हा हिंदूधर्माच्या नितीशास्त्रातील मुलभूत नियम आहे. चांगुलपणा हा एकच शब्द तिघां करता वापरण्याची पद्धत आहे, प्रत्येक वेळा तिनांचा उल्लेख करण्याची आवश्यकता नसते.*

अतिथी ब्राह्मण राजाला विचारतो, "माझा मित्र उंच्छ व्रत करण्याचे ठरवत आहे तरी त्या व्रताची आणखीन माहीती सांगाल तर बरे होईल. उंच्छ व्रतात शेतात सांडलेले धान्य, फळं, कंदमूळ असें खाद्या पदार्थ गोळा करून ते खाऊन त्यावर गुजराण करणे आणि तपस्या करणे (जपयज्ञ इत्यादि) असे साधारणपणे उंच्छ व्रताचे स्वरुप असते. ते मला माहीत आहे त्यापेक्षा आणखीन काय असते ते सांगा, आपण त्या विषयाचे जाणकार अहात म्हणून मी तुम्हाला विचारत आहे".

राजा सांगतो, "उंच्छ व्रताचा प्रमूख उद्देश केवळ सांडलेले खाद्य गोळा करून खाणे असा नाही, त्यापेक्षा बरेच कांहीं त्यात आहे. अहंकाराचा नाश करणे हा प्रमुख उद्देश असतो. उच्छ खाणे हे अहंकाराचा नाश करण्यासाठीचे एक प्रयोजन असते. त्याशिवाय इतर मोलमजूरीची काम जसें संडास साफ करणे, घाण उचलणे, भिक्षा मांगणे, कचरा काढणे असे सगळे ज्यामध्ये सन्मानाला ठेंच पोहोचण्याचे व त्यामुळें अहंकार कमी होणे असे अपेक्षित असते. अशा कामांत अहंकाराचा नाश करण्याची क्षमता असते. अशा प्रयोजनाने

साधक त्याचा अहंकार संपवू शकतो. उंच्छ व्रतात ते असते. तुच्छ समजली गेलेली अशी सगळी चांगली कामं त्या उंच्छ व्रतात मध्ये येतात. केवळ शेतातून धान्य, फळं आणि कंदमूळ गोळा करणे एवढेच नाही, ते फक्त एक प्रातिनिधीक स्वरुपाचे आहे".

अतिथी ब्राह्मण पुढे विचारतो, "अहो राजे मी एक प्रसंग आठवतो त्यावर आपले काय भाष्य आहे ते आम्हाला ऐकावेसे वाटते कारण आपले विवेचन फारच मुद्देसूद असते. त्याचे असें झाले कीं, एका कुणाल नांवाच्या दस्यूच्या शेतात कांहीं उंच्छ व्रतस्थ ब्राह्मण मातीत पडलेले धान्य गोळा करून त्यावर ते त्यांची गुजराण करत होते. जेव्हां त्या दस्यूला ते समजले तो जाणूनबुजून शेतात जास्त धान्य सांडू लागला म्हणजे त्या ब्राह्मणांना पुरेसे धान्य मिळावे. उंच्छ व्रतस्थ ब्राह्मण केवळ एक ओंजळीभरच धान्य घेऊ शकतो त्या व्रताच्या नियमांनुसार. त्यामुळे जास्त धान्य सांडले गेल्यामुळे जास्त ब्राह्मण त्याच्या शेतातून उंच्छ धान्य गोळा करू शकत होते. आता मला सांगा कीं, अशारितीने मुद्दाम धान्य शेतात सांडून तो दस्यू कांहीं पुण्य साधत होता कां"? त्याची अध्यात्मिक उर्जा वाढत होती कां"?

राजा पद्मनाभ सांगतो, "तो दस्यू मोठे पुण्यकार्य करत होता अशा रितीने धान्य शेतात सांडून". त्यात गंमत अशी आहे कीं, अहो ब्राह्मणानो, त्या दस्यूचा उद्देश थोर होता त्यामुळें त्या ब्राह्मणांची अध्यात्मिक उर्जासुद्धा किंचित प्रमाणात त्याला मिळत होती. उंच्छ व्रतात असलेल्यांना मदत करून तो त्याची अध्यात्मिक शक्ती वाढवत होता जरी त्याला त्याची कल्पना नसेल. हे चांगुलपणाच्या बाबात जे नियम आहेत त्यानुसार होत होते. चांगुलपणा कोठलीही अपेक्षा न ठेवता करण्याने तसे फायदे त्या माणसाला होत असतात".

अतिथी ब्राह्मण विचारतो, "गृहीणी तिच्या घरात उच्छ कामें नित्यपणे कोणतीही तक्रार न करता जीवनभर करत असतात व संसाराचा गाडा हाकत असतात. मला सांगा त्या गृहीणींना उंच्छ व्रताचे फायदे स्वाभाविकपणे होतात कां"?

राजा सांगतो, "तुझं म्हणण योग्य आहे. उंच्छ व्रताचे फायदे त्यांना होतात. अनेक स्त्रीयांना माहीत नसते कीं, त्या स्वर्गाच्या दिशेने झपाट्याने जात आहेत".

दोनही ब्राह्मण राजाला हात जोडून बोलतात कीं, "महाराज आपण आम्हाला जे प्रबोधन केले आहे त्यामुळे आम्ही सूज्ञ झालो आहोत. तरी एक प्रश्न आहे कीं, ज्या विविध साधना पद्धती आपण विचारात घेतल्या त्यांचा उपयोग स्वतंत्रपणे करणे योग्य असते कां त्यांच्या प्रयोग एकत्रितपणे करणे योग्य असते त्याबद्दल आपले मत सांगा".

राजा सांगतो कीं, "त्याचा प्रयोग एकत्रितपणे करण्याने अध्यात्मिक उर्जा जास्त वेगांने वाढत असते, म्हणून ते साधकाच्या कुवतीप्रमाणे त्याने एकत्रितपणे करावयाचे असतात. तुम्ही आता च्यवन ऋषींच्या आश्रमात जाणार अहात असे मी समजतो व जर तसे असेल तर त्यांच्या मार्गर्शनाखाली तुम्ही उभयता तुमची साधना करावी.
यजमान ब्राह्मण विचारतो, "त्याबद्दल जास्त सांगा".
राजा सांगतो, "जपयज्ञ, ध्यान साधना, सोऽहम साधना, विपासना, योगीक साधना, ब्रह्मचर्य (इंद्रिय संयमन), तपश्चर्या (विचारशून्य अवस्थेत जाणे) अशा अनेक साधना अध्यात्मिक सामर्थ्य वाढवण्यासाठी सुचवल्या जातात. त्यातील ब्रह्मचर्य साधकाला बंधनकारक असते, त्याशिवाय इतरांपैकी कोणतीही एक अध्यात्म साधना करावी. परंतु, त्या कोणत्यानेही अहंकार मात्र नष्ट होत नाही. त्यासाठी उंच्छ व्रताचे पालन हा एकच मार्ग ऋषी सांगतात. अशा साधनामुळें अध्यात्मिक सामर्थ्य वाढल्याने तो साधक देव न बनता उलट राक्षस, दैत्य, दानव, असुर बनण्याची शक्यता असते. म्हणून अहो द्विजांनो, माझे ऐका, तुम्ही त्या अध्यात्मिक बळ वाढवणार्या साधना करतांना त्याबरोबर उंच्छ व्रताचे सुद्धा पालन केले पाहिजे. नाहीतर तुमच्यात दैवी शक्ती संचारण्या ऐवजी राक्षसी, असुरी शक्ती संचारण्याची शक्यता असेल".
दोघेही एकत्रपणे राजाला बोलतात कीं, तूर्त त्याच्या शंकांचे समाधान झाले असले तरी जर कांहीं शंका उत्पन्न झाल्या तर आम्ही आपल्याला भेटण्यास येणार आहोत, ते ऐकून राजा आनंदी झाला.

पुढे राजा त्यांना विचारतो, "आता आपण दोघे ब्राह्मण कोठे जाणार अहात"? माझ्या कडे जे काम तुमचे होते ते पूर्ण झाले असेल तर मी तुम्हाला रजा देण्याला तयार आहे तरी

माझी आपल्या दोघांना एक विनंति आहे कीं, आपण कांहीं दिवसासाठी माझा पाहूणचार घ्यावा. तुम्ही दोघे माझ्याकडे आला होता परंतु, माझ्या घरी न रहाता येथे वनात रहात होता ते मला माझ्या गृहस्थाश्रमाच्या रिवाजानुसार योग्य वाटत नाही. आमचे नागा लोक मला दोष देतील जर मी आपला यथायोग्य पाहूणचार नाही केला. आपण माझे चांगले स्नेही झाला अहात. ज्या पद्धतीने तुम्ही दोघे दूर वनात माझ्यासाठी जपयज्ञ करत होता त्यामुळें मी तुमच्यावर संतुष्ट झालो आहे. आता असे समजा कीं, ह्या नगरातील सगळे लोक तुमचे चाहते झाले आहेत. आपण गृहस्थी अहात तेव्हां अशारितीने वनात राहिलात ते माझ्या पत्नीला सुद्धा खटकले.

ब्राह्मण बोलतो, "आपण मोठे ज्ञानी अहात. आपण एकाद्या देवतेपेक्षा जास्त जाणकार अहात. आपण सगळे एकाच परब्रह्माचे अंश असतो. परंतु, केवळ प्रकृतीच्या भ्रमात आपण वेगळे वेगळे आहोत असें समजत रहातो. परंतु हे माझ्याकडे माहीती आहे त्याचे ज्ञानात रुपांत जोवर होत नाही तोवर आपण वेगळे वेगळे असंच मी समजत रहाणार आहे. अहो राजे, मी त्या ज्ञानासाठी उत्सुक आहे. म्हणून तुम्हाला तसदी दिली. चांगुलपणाचा धर्म कसा आचरावा त्याबद्दल मला अनेक शंका होत्या त्यांचे निराकरण आज झाले आहे. आपल्याकडून उंच्छ व्रताची माहीती समजली त्याप्रमाणे मी पुढे जगण्याचा विचार करत आहे. पाहू या, मला कितपत ते जमते. कांहीं गोष्टी प्रथम आकर्षक वाटतात पण खोलात गेले कीं वेगळेच चित्र पुढे येते असा नेहमी अनुभव येतो. माणसाने कोणत्या मार्गाने मोक्ष साधना करावयाची ते त्याच्या स्वाभाविक प्रवृत्तीवर अवलंबून असते. मला असें वाटते कीं, उंच्छ व्रतापेक्षा जपयज्ञ माझ्यासाठी जास्त सोयिस्कर ठरेल कारण तो गृहस्थाश्रमाच्या जवळचा आहे असे मी समजतो. अजून मी मनाने गृहस्थाश्रमी आहे. असे बोलून तो सज्जन ब्राह्मण राजाची रजा घेण्यासाठी उठतो. माझा येथे येण्याचा उद्देश सफल झाला म्हणून मी समाधानी आहे". एवढे बोलून ते ब्राह्मण राजाला सांगतात कीं, त्याचे पाहूणचाराचे आमंत्रण ते राखीव ठेवत आहेत आणि त्यांची साधना चालू असतांना ते ब्राह्मण त्याचा पाहूणचार घेण्यासाठी येणार आहेत.

ते ऐकून नागा राजा पद्मनाभ संतुष्ट होतो. त्यानंतर ते दोघे त्या अरण्यातून च्यवन ऋषीच्या आश्रमाकडे निघतात. ते ब्राह्मण यम आणि नियम ह्यांचे पालन करू लागतात. त्याशिवाय ते जपयज्ञ करू लागतात.

भिष्म पुढे सांगतात, अशारितीने त्या श्रेष्ठ नागा राजाला वंदन करून तो ब्राह्मण धर्मारण्य व त्याचा अतिथी मेघकेतू असे दोघे तेथून निघतात. त्यातील एक उंच्छ व्रतात रहाण्याचा संकल्प मनात धरून असतो व दुसरा जपयज्ञाच्या संकल्पाने उत्सुक झालेला असतो. ते दोघे भृगूच्या वंशातील च्यवन ऋषीच्या आश्रमाकडे निघतात. तेथे ते त्यांच्या नवीन जीवनाच्या सुरूवातीसाठी वचनबद्ध होतात. दुसरा जपयज्ञाच्या तयारीला लागतो.

ही कथा जनकाला तो च्यवन सांगतो, ती जनक नारदाला सांगतात. ती कथा नारद इंद्राला सांगतात. त्यानंतर इंद्र ती कथा अनेक ऋषींना सांगतो.

भिष्म पुढे सांगतात, त्यानंतर माझा भार्गवाशी (परशुराम) झालेल्या द्वंद्वात तो हरल्यावर त्यांने माझे प्रबोघन करण्यासाठी मला ती कथा सांगितली. आता ती मी तुला सांगत आहे ह्या कथेत अनेक गोष्टींचे विविरण उत्तम झाले आहे. त्यामुळे ही कथा सगळ्यांनी ऐकावी अशी आहे.

तू मला कोणती कर्तव्ये श्रेष्ठ असें विचारले होतेस, ह्या कथेत त्याची उत्तर आहेत असे मी समजतो.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे एक्याण्णव संपला.

## - शांती पर्व भाग दहावा संपला -

# - शांती पर्व संपले -

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७७ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे ४० खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी

तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चाने शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे,

माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा

मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळीराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता,

जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यंत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मागवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.

esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद,